बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | सोमवार,दि.७ एप्रिल २०२५ | वर्षे ४थे | अंक २३५वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# जगभरातील बाजार कोसळला!

५० हून अधिक देशांनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांशी संपर्क ◆ राष्ट्रीय आर्थिक परिषदेच्या संचालकांचा दावा ◆ डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्यापार धोरणांचे समर्थन ◆ काही देशांवर १० टक्के तर काही देशांवर ४० टक्के शुल्क

पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:व्हाईट हाऊसच्या राष्ट्रीय आर्थिक परिषदेचे संचालक केविन हॅसेट यांनी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्यापार धोरणांचे समर्थन केलं आहे. तसंच, यामुळे अमेरिकेतली ग्राहकांवर मोठा परिणाम होणार असल्याचे दावेही फेटाळले आहेत. दरम्यान, वाढत्या आयात शुल्कावरून ५० हून अधिक देशांनी राष्ट्राध्यक्षांशी संपर्क साधला असल्याचंही ते म्हणाले. टाइम्स ऑफ इंडियाने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.मला काल रात्री एक अहवाल प्राप्त झाला आहे. यामध्ये ५० हून अधिक देशांनी वाटाघाटी सुरू करण्यासाठी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी संपर्क साधला आहे. कारण, त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात आयात शुल्क लादण्यात आले आहे, असं केविन हॅसेट म्हणाले.




डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांचं समर्थन करताना ते पुढे म्हणाले, मला वाटत नाही की अमेरिकेतील ग्राहकांवर मोठा परिणाम होऊ शकणार आहे. कारण आपल्याकडे दीर्घकालीन व्यापार तूट कायम राहण्याचे कारण या देशांतून पुरवठा फारच कमी राहिलेला आहे.डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी (३१ मार्च) आयात शुल्क लागू केले. यामुळे काही देशांवर १० टक्के तर काही देशांवर ४० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क लादण्यात आले आहे.

## आयात शुल्कामुळे शेअर बाजार गडगडला

दरम्यान, जे. पी. मॉर्गन यांनी २०२५ च्या अखेरिस अमेरिकेत मंदी येण्याचा अंदाज वर्तवला आहे. त्यासाठीच हे शुल्क आकारले गेले आहेत. अंदाजानुसार जीडीपीमध्ये घट आणि बेरोजगारी वाढण्याची शक्यता आहे. फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष जेरोम पॉवेल यांनीही चिंता व्यक्त केली आणि या शुल्कांमुळे महागाई वाढू शकते आणि विकास मंदावू शकतो.


डोनाल्ड ट्रम्प यांच्या या घोषणेनंतर जगभरातील शेअर बाजार सातत्याने कोसळत राहिला. भारतातील शेअर बाजारातही मोठी घसरण पाहायला मिळाली. तर, अमेरिकेच्या शेअर बाजारातही गुंतवणूकदारांचं मोठं नुकसान झालं.

# ठाकरेंची शिवसेना शिल्लकही राहणार नाही

**चर्चेतले:** रावसाहेब दानवेंचा मोठा दावा

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोप सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे. राज्यातील विविध मुद्यांवरून विरोधक महायुती सरकारवर टीका करत आहेत, तर त्या टीकेला सत्ताधारी पक्षाचे नेते जोरदार प्रत्युत्तर देत आहेत. यातच आज भारतीय जनता पक्षाचा वर्धापन दिन असल्याने राज्यातील विविध ठिकाणी कार्यक्रम पार पडले आहेत. जालना जिल्ह्यात देखील या पार्श्वभूमीवर मजबूत संघटन ऑनलाईन कार्यकर्ता संमेलन पार पडलं.या संमेलनाच्या माध्यमातून भाजपाचे नेते तथा माजी खासदार रावसाहेब दानवे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. मात्र, याचवेळी रावसाहेब दानवे यांनी काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार) आणि ठाकरे गटावर जोरदार टीका केली. यावेळी



रावसाहेब दानवे यांनी एक मोठा दावा केला आहे. 'उद्धव ठाकरे यांची शिवसेना पुढच्या निवडणुकीपर्यंत राहणार नाही', असं विधान रावसाहेब दानवे यांनी केलं आहे.एक काळ असा होता की जिल्ह्यात शिवसेनेचे ३ आमदार आणि भारतीय जनता पार्टीकडून मी एकटाच आमदार होतो. मात्र, आज काळ असा आहे की भारतीय जनता पक्षाचे ३ आमदार आणि शिवसेनेचे २ आमदार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचं कोणी आहे का? म्हणजे काँग्रेस आणि राष्ट्रवादीची मोठी ताकद होती. पण त्यांच्या वागण्यामुळे पान २ वर

# हापूस आंब्यांवरून होणारी फसवणूक

**निर्णय:** कोकणातील उत्पादकांचं डिजिटल पाऊल!



पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:महाराष्ट्रातील कोकण भागातील आंब्यांना आता जीआय कवच मिळाले आहे. यामुळे बनावट आंबे सहज ओळखता येणार आहेत. कोकणातील हापूस आंब्याच्या उत्पादकांनी जवळपास १ हजार ८४५ जीआय टॅग मिळवले आहेत. हापूस अंबा उत्पादक विक्रेता सहकारी संघाचे सचिव मुकुंद जोशी म्हणाले की, देशातील वैयक्तिक उत्पादनांसाठी जारी केलेल्या ऋ्ख टॅगची ही सर्वाधिक संख्या असेल. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. जोशी म्हणाले की, हापूस आंब्याचा जीआय टॅग कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, पालघर आणि ठाणे या पाच जिल्ह्यांमध्ये उत्पादित होणाऱ्या फळांसाठी राखीव आहे. रसाळ चव आणि रंगांसाठी ओळखल्या जाणाऱ्या आंब्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही आंब्यांना हापूस टॅग वापरण्याची परवानगी नाही. फळ उत्पादक आणि विक्रेत्यांची सहकारी संस्था असलेल्या संघाने कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या इतर प्रदेशांमध्ये देखील पिकवल्या जाणाऱ्या आंब्यांसाठी वापरल्या जाणाऱ्या हापूस या संज्ञेच्या उल्लंघनाविरुद्ध कारवाई सुरू केली आहे.जीआय (भौगोलिक संकेत) केवळ एका विशिष्ट प्रदेशात उत्पादित होणाऱ्या कृषी मालांना लागू होते. अशा प्रकारे जर ते दुसऱ्या प्रदेशातून मिळवलेल्या वस्तूंचे ब्रँडिंग करण्यासाठी वापरले गेले तर ते उल्लंघन ठरेल, असं जोशी म्हणाले. संघ त्यांच्या सदस्यांना आणि सहकारी शेतकऱ्यांना त्यांच्या शेतांसाठी जीआय टॅग अर्ज करण्यास आणि मिळविण्यास मदत करत आहे. आमच्या प्रदेशातून मिळवलेल्या आंब्याच्या पेट्यांमध्ये क्यूआर कोड स्कॅनिंग आहेत ज्यामुळे शेतीची माहिती आणि जीआय टॅग मिळू शकतो, असंही त्यांनी स्पष्ट केलं.राज्यातील हापूस उत्पादकांनी बाजार समित्या आणि राज्य पणन मंडळाला हापूस ब्रँडचे उल्लंघन रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, अनेक शेतकरी पान २ वर

# स्वच्छता गृहासाठी ठेवलेले पाणी पिण्याची वेळ

**चर्चा:** स्थानिक आ. नमीता मुंदडा निलंबन करण्यात व्यस्त?

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:अंबाजोगाई मतदार संघातील सर्वात मोठा दवाखाना स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात एक ना अनेक समस्या आहेत प्रत्येक समस्येला फक्त डीनच जबाबदार नसतो मग वार्डाचे इन्चार्ज , विभागप्रमुख इतरांची काही जबाबदारी नाही का ? तसेच स्थानिक आमदार नमीता मुंदडा यांची सुध्दा जबाबदारी आहे परंतु आमदारा नमीता मुंदडा यांना फक्त चांगल्या अधिकाऱ्यांचे




निलंबन करायला जमत बाकी जनता वाऱ्यावर आणी स्वाता तोऱ्यात असे वागणे आमदारा नमीता मुंदडा यांचे आहे त्यामुळे शासकीय रुग्णालयातील वार्डात पिण्याच्या पाण्याचा ठणठणाट आहे सर्वात गंभीर बाब म्हणजे वार्डाच्या स्वच्छतागृहात पाण्याची टाकी ठेवली आहे त्यावर पिण्याचे पाणी असा उल्लेख असल्याने अनेक नातेवाईकांना वाटले हे पिण्याचे पाणी समजून ते पाणी पीत असल्याचे समजले जाते आहे. आता काय आमदारा नमीता मुंदडा आमदारा सासरे झोपले का असा प्रश्न उपस्थित होतो आहे.केज तालुका दुःखात असताना सत्कार घेण्यासाठी जायला आमदारा नमीता मुंदडा यांना जमत आणी तेथील सुविधा उपलब्ध करून देण्यात मात्र मरगळ येते का असा संतप्त सवाल जनतेतून केला जात आहे सध्या उन्हाळ्याचे दिवस आहेत त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला पाण्याची नितांत गरज असते प्रत्येक वार्डात रुग्ण व त्यांचे नातेवाईकांना पिण्याचे पाणी नसल्याने त्यांना पान २ वर

# पंचनामे करुन सरसकट भरपाई द्या

**आ.संदीप क्षीरसागर:** अवकाळी पावसाने नुकसान

पुण्यभूमी प्रतिनिधी

मागील दोन दिवसांत संपूर्ण जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकर्यांच्या पिकांचे व फळबागांचे आतोनात नुकसान झाले आहे आणि होत आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्या. अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी शासनाकडे केली आहे.



बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील बीड व शिरूर कासार तालुक्यासह संपूर्ण बीड जिल्ह्यात १ ते ३ एप्रिलच्या दरम्यान अवकाळी पाऊस झाला. या पावसाने शेतकऱ्यांच्या शेतात असलेल्या पिकांचे तसेच फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे आणि अद्यापही होत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या वतीने अवकाळी पाऊस हे कारण नियमोचित दाखवून झालेल्या नुकसानीची तक्रार पीक विमा कंपनीच्या 'क्रॉप इन्शुरन्स' पवर करण्यासाठी तलाठी अर्थात महसूल आणि कृषी विभागाच्या यंत्रणेकडून शेतकर्यांना कळवावे. तसेच प्रशासनाने तातडीने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीचे पंचनामे करावेत जेणेकरून शेतकरी बांधवांना नुकसान भरपाई मिळण्यास मदत होईल. अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री, मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, कृषी आयुक्त तसेच जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

# मंत्री कदमांचा मोबाईल चोरी गेलाच नाही

**अनिलदादा जगताप:** विरोधकांनी अफवा पसरवने बंद करावे

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: जिल्हा दौऱ्यावर असताना गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचा मोबाईल चोरी गेल्याच्या बातम्या शनिवारी दिवसभर सर्व टीव्ही चॅनलवर, पोर्टलवर सुरु होत्या. मंत्र्यांच्या मोबाईल चोरीच्या बातमीने राज्यभर खळबळ उडवून दिली. मंत्र्यांचाच मोबाईल सुरक्षित नाही तिथे सर्वसामान्यांचे काय? असा प्रश्न देखील नेत्यांमधून उपस्थित होऊ लागला होता. या सर्व प्रकारानंतर शनिवारी रात्री उशिरा बीड पोलीस अधीक्षकांनी मोबाईल फोन विसरला होता नंतर तो कोणीतरी आणून दिला असे स्पष्टीकरणही दिले आहे. मात्र विरोधक आऊचा बाऊ करून सोशल मीडियावर अफवांचे वावडळ आणत आहेत. याबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी पत्रक कढून सविस्तर माहिती दिली आहे की, विविध समाज माध्यमांवर व विविध न्यूज पोर्टलवर मा. योगेश



कदम, राज्यमंत्री (गृह) महाराष्ट्र राज्य हे मस्साजोग ता. केज येथे आलेले असतांना त्यांचा मोबाईल गहाळ/चोरी गेल्याची बातमी प्रसारित झाली. परंतु सदर बाबत सत्यता अशी आहे की, मा. मंत्री महोदय हे मस्साजोग येथे धनंजय देशमुख व कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी धनंजय देशमुख यांच्या शेजारी बसलेले होते. पत्रकारांशी संवाद साधताना मोबाईल खाली ठेवला होता त्यानंतर ते बांधकाम सुरू असलेले घराची पाहणी करण्यासाठी चालत गेले. घराची पाहणी करत असताना त्यांनी पीएंकडे मोबाईल मागीतला त्यावेळी पीएंनी माझ्याकडे मोबाईल नाही असे सांगीतले. त्यावेळी मंत्री महोदय यांनी मोबाईल शोधा असे म्हटले. हे वाक्य उपस्थित लोकांपैकी कुणीतरी ऐकून बाहेर वाच्यता केली. परंतु मंत्री महोदय व मी स्वतः जाण्यासाठी गाडीत बसलो असता कोणीतरी मोबाईल आणून माझ्याकडे दिला व तो मोबाईल मी स्वतः मंत्री महोदय योगेश कदम यांच्याकडे दिला. मंत्री महोदयांना त्यांचा मोबाईल मिळाला आहे, हे बाहेर माहीत नसल्यामुळे या अफवा जाणीवपूर्वक पसरवल्या चालल्या आहेत. मंत्री महोदय यांचा मोबाईल चोरी झालेला नाही. कृपया कोणीही अफवांवर विश्वास ठेऊ नये. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे पान २ वर

**अभिनंदन** | **बहुचर्चेतील शॉर्ट फिल्म वनवा यामध्ये प्राचीने केली दमदार भुमिका**

# मिस्त्रीची लेक अभिनयात नंबर एक

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:अभिनयामध्ये करिअर करणं हे अनेकांचं स्वप्न असतं. तसे स्वप्न प्राचीने अगदी बालपणापासून पाहिले होते. योगायोगाने माजलगाव येथील पत्रकार बाळासाहेब आडागळे यांनी त्यांच्या शॉर्ट फिल्मसाठी ऑडिशन घेतले, तेव्हा त्यांना प्राची सारखी दमदार अभिनय करणारी अभिनेत्री भेटली, एकीकडे बाळासाहेब आडागळे यांना दमदार अभिनय करणारी अभिनेत्री मिळाली आणि दुसरीकडे अभिनय करण्यासाठी संधी मिळाल्याने प्राचीचे स्वप्न साकार होत असल्याने तिच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. एका गावंड्याची मुलगी अभिनय क्षेत्रात दमदार पदार्पण करीत असल्याचे पाहून सर्वसामान्य व्यक्तींना देखील याचा मनस्वी आनंद झाल्याचे पहावास मिळाले.





**वडीलांसोबत प्राची:** गवंड्याची पोरगी अभिनय करतेय याचा मला अभिमान वाटतो !!: माझ्या सगळ्या पिढ्या मोलमजुरी, कष्ट करून गुजरान करीत होत्या. आज मी देखील गवंडी म्हणून काम करतो. मला दोन मुली आहेत त्यापैकी प्राची अभिनय क्षेत्रात काम करते, तर मोठी मुलगी पुण्यात शिक्षण घेतेय याचा मला प्रचंड आनंद आणि अभिमान वाटतो. प्राचीनी निवडलेले क्षेत्र तिच्या स्वप्नांना बळ देणारे आहे. मी बाप म्हणून प्राचीसाठी कुठेही उभे रहायला तयार आहे, पण तिचे स्वप्न साकार व्हावे, हीच देवाचरणी प्रार्थना, अशी प्रतिक्रिया प्राचीचे वडील अनिल सोनवणे यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांनी व्यक्त दिली.

## आकाशाला गवसणी घालण्याची इच्छाशक्ती

क्षेत्र कोणतेही असो तुम्ही तुमच्या ध्येयाशी प्रामाणिक असाल तर घरची परिस्थिती कितीही हालाखीची असली आणि घरात अठरा विश्व दारिर्थ असले तरी तुमचे ध्येय साध्य करण्यापासून कोणीच रोखू शकत नाही. आकाशाला गवसणी घालायची प्रबळ इच्छाशक्ती तुमच्या मनात असेल तर तुम्हाला तुमची परिस्थिती आडवी येऊच शकत नाही. आज मी हेच अनुभवत आहे, पत्रकार बाळासाहेब आडागळे यांनी मला त्यांच्या शॉर्ट फिल्ममध्ये संधी देऊन माज्या स्वप्नांना बळ दिले त्यामुळे मी त्यांची आभारी आ, हे अशी प्रतिक्रिया अभिनेत्री प्राची हिने व्यक्त केली.

# बीडमध्ये फुले आंबेडकर युवक सभा

**परिसंवाद:** उपस्थित राहण्याचे अनिल डोंगरेंचे आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: फुले आंबेडकर युवक सभेकडून, बीडमध्ये फुले आंबेडकरी चळवळ समजून घेऊया या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.हा परिसंवाद बीड शहरातील छत्रपती राजर्षी शाहू महाराज स्पर्धा परीक्षा केंद्र येथे मंगळवार (दि.८) रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष अनिल डोंगरे यांनी केले आहे.



प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे की, फुले आंबेडकरी चळवळ समजून घेऊया या कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून विचारवंत गौतमीपुत्र कांबळे, उदघाटक म्हणून माजलगाव विभागाचे एसडीएम गौरव इंगोले, तर अध्यक्षस्थानी डॉ.विक्रम धन्वे असणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक अमन शिरसाट, डॉ.मनोहर शिरसाठ, राजर्षी शाहू महाराज स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक राहुल वाघमारे यांची उपस्थिती असणार आहे. आज सध्या स्थितीत फुले आंबेडकरी चळवळ समजून घेणे, अतिशय महत्वाचे होत चालले आहे. त्यामुळे फुले आंबेडकरी चळवळ समजून घेऊया पान २ वर

## हिंदी-चिनी ते हत्ती-ड्रॅगन!

सरत्या संपूर्ण सप्ताहात डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'टॅरिफ बॉम्ब'च्या वर्षावात एका महत्त्वाच्या तारखेकडे काहीसे दुर्लक्ष होणे तसे अपेक्षितच. पण अमेरिकी शासकांच्या सध्याच्या दंडेली कार्यखंडाच्या पार्श्वभूमीवर त्या घटनेचे महत्त्व खरे तर अधोरेखित व्हायला हवे. तर ती तारीख होती १ एप्रिल. त्या दिवशी बरोबर ७५ वर्षांपूर्वी, म्हणजे १ एप्रिल १९५० रोजी भारत आणि चीन या दोन प्राचीन देशांमध्ये अधिकृत राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले. अधिकृत राजनैतिक असे म्हणायचे, कारण सांस्कृतिक आणि असंघटित व्यापारी संबंध कित्येक शतके अस्तित्वात होते. जगातील आद्या संस्कृतींमध्ये या दोन संस्कृतींचा उल्लेख अग्रक्रमाने केला जातो. त्यांचा वारसा सांगणाऱ्या या दोन अवाढव्य देशांमध्ये अशा प्रकारे संबंध प्रस्थापित झाल्याची दखल त्यावेळच्या जगाने किती घेतली याचा तपशील उपलब्ध नाही. पण त्या वेळी चीनच्या बंद साम्राज्याची कवाडे नुकतीच कुठे किलकिली होत होती, तर भारताकडे पंडित जवाहरलाल नेहरूंच्या रूपात एक जागतिक छाप असलेला नेता होता. ब्रिटिशांनी निघून जाऊन तीनच वर्षे लोटली होती, त्यामुळे काही प्रमाणात तरी पाश्चिमात्य मुख्य प्रवाहातील माध्यमांचे भारताकडे लक्ष असायचे. भारत आणि चीन हे भविष्यात सर्वाधिक लोकसंख्येचे देश बनतील आणि जगात सर्वाधिक वेगाने विस्तारणाऱ्या अर्थव्यवस्था बनतील अशी शंका तेव्हा वाटण्याची शक्यताच नव्हती. ३०० कोटींच्या जवळपास एकत्रित लोकसंख्या आणि १० लाख कोटींच्या आसपास एकत्रित जीडीपी हे आकडे दडपून टाकणारे आहेत. यांतील एक देश निर्विवादपणे जगाची उत्पादक राजधानी आणि अनेक मोठ्या उत्पादनांच्या बाबतीत मोठी बाजारपेठ, तर दुसरा देश कुशल कामगारांचा सर्वांत मोठा निर्यातदार आणि अनेक बाबतीत जगातील अग्रणी बाजारपेठही. हे दोन देश एकत्र आले, तर काय बहार येईल अशी इच्छा वेगवेगळ्या चिनी राज्यकर्त्यांनी वेगवेगळ्या काळात बोलून दाखवली. ते त्यांचे बोलण्याचे चेहरे.प्रत्यक्षात अगदी सुरुवातीपासूनच चीन हा भारताचा स्पर्धक होता. आज तिची जागा बऱ्याच प्रमाणात तुच्छतेने घेतली असेलही. ती का असा प्रश्न इथल्यांनाच अनेकदा पडतो. भारताची संभावना चिनी सरकारी माध्यमातून 'अकार्यक्षम, आळशी' देश अशी होत असली, तरी भारताचे महत्त्व एका मर्यादेपलीकडे प्रथम सोव्हिएत रशिया आणि नवीन सहस्राकात अमेरिका, कमीअधिक प्रमाणात युरोप, कायमच जपान, अलीकडच्या काळात अरब राष्ट्रांच्या नजरेत नेहमीच राहिले ही बाब चिनी नेतृत्व स्वीकारू शकत नसले, तरी नाकारूही शकत नाही!

तिबेटचे ब्रिटिशांनी केलेले सीमांकन चीनला मान्य नव्हते. तसे तर त्यांना ब्रिटिशांनी केलेले कोणतेही सीमांकन मान्य नाही. जपानने चीनवर अनेक आक्रमणे केली, बऱ्याचशा भूभागावर अनेक वर्षे ताबाही मिळवला. ती सगळी जुनी 'दुखणी' चीन आज उगाळत आहे, कारण त्यांचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांनी गतदशकात चिनी सांस्कृतिकवादाला चिनी वर्चस्ववादाची जोड दिली. १९९५ पर्यंत चीनची अर्थव्यवस्था वेग आणि विस्ताराच्या निकषावर भारताच्या मागे होती. पण नवीन सहस्राकात तिने भरारी घेतली. अवघ्या १५ ते २० वर्षांच्या कालखंडात एखाद्या देशाने, कोणत्याही देशावर आक्रमण न करता इतक्या झपाट्याने आर्थिक प्रगती केल्याचे उदाहरण मानवी इतिहासात दुसरे नाही. चीनची प्रगती केवळ आर्थिक आघाडीवर नव्हती. त्यास तंत्रज्ञानातील प्रगतीचे अधिष्ठान होते. शिवाय लष्करी बलवृद्धीचा उन्मादही होता. आंतरखंडीय क्षेपणास्त्रे, लढाऊ विमाने, लढाऊ युद्धनौका आणि दीर्घ पल्ल्याच्या पाणबुड्या यांची निर्मिती चीनच्या लोकसंख्यात्मक आणि तंत्रगुणात्मक क्षमतेच्या मिलाफातून मोठ्या प्रमाणात आणि झपाट्याने झाली. आंतरराष्ट्रीय युद्धकारणात जेथे रशियाचे महत्त्व कमी झाले नि अमेरिकेला शत्रूच राहिला नाही असा समज पसरविला गेला, तेथे तो अवकाश चीनने सहजपणे व्यापला. आज व्यापारयुद्धात आणि सामरिक परिप्रेक्ष्यातही अमेरिकेला चीनची भीती वाटते, त्या दृष्टीने तेथे धोरणे ठरवली जातात हे वास्तव.याच काळात भारत खूपच मागे पडत गेला हेही खरेच. म्हणजे अर्थव्यवस्था आपलीही विस्तारत होती. पण चीनच्या दौडीच्या तुलनेत आपली केवळ दुडुदुडु धावत होती. १९६२च्या युद्धात चीनने भारताचा काही भूभाग ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. तो काही प्रमाणात यशस्वी झाला. जिनपिंग यांच्या युद्धखोरीमुळे चीनने विशेषत: पूर्व लडाखचा काही भाग बळकावण्याचा प्रयत्न केला. तो फसला. त्याबद्दल भारत सरकारच्या आणि लष्कराच्या दक्षतेवरून रास्त टीका झाली हे खरे, पण २०२० मध्ये आक्रमक बनलेल्या चीनने २०२३च्या अखेरीस आणि २०२४ मध्ये स्वत:हून वाटाघाटी सुरू केल्या हेही खरे. हे का घडले असावे? भारताच्या बाबतीत चिनी राज्यकर्त्यांच्या धोरणात सातत्य नसते हेच यातून दिसून येते. कधी असूया, बऱ्याचदा तुच्छता, क्वचित वेळी आदर. सध्या 'आदरपर्व' सुरू असावे असे दिसते. गतवर्षी अमेरिकेला मागे टाकून चीन भारताचा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार बनला. पण या व्यापारातही चीनचे आधिक्य ८५.१ अब्ज डॉलर इतके अवाढव्य आहे. तरीही भारताशी वाटाघाटी करण्याची, विवाद्या मुद्दे चर्चेतून सोडवण्याची आणि आर्थिक सहकार्य वाढवण्याची भाषा चीनकडून अलीकडे वरचेवर होते. पाकिस्तान सोडला, तर चीनचा एकही मित्रदेश भारताशी थेट शत्रुत्व सांगत नाही. रशिया जितका चीनचा मित्र त्यापेक्षा अधिक तो भारताचा मित्र. अमेरिका आणि पाश्चिमात्य जगतात आजही चीनला सक्षम पर्याय म्हणून भारत ठरू शकतो ही भावना प्रबळ आहे. बऱ्याचदा ही भावना फक्त भावनाच राहिलेली आहे आणि यांतील काही आडाखे सपशेल फसलेले आहेत हे मान्य केले, तरी भारतीय बाजारपेठेवर चीनला येत्या काळात अवलंबून राहावे लागेल, हे नक्कीच. पेन-पेन्सिल, हेअरपिनांपासून अजस्रा टर्बाइन, सौरपट्ट्या, छिद्रयंत्रे अशा सामग्रीपर्यंत चिनी मालासाठी भारतीय बाजारपेठ विस्तारतेच आहे. भारत ही चीनची जगातली सर्वांत मोठी व्यापारपेठ बनली हा दावा सर्वस्वी चुकीचा ठरत नाही.

# राष्ट्र निर्माण अंतर्गत कार्यशाळेला प्रतिसाद!

## कार्यक्रम: सामाजिक-आर्थिक मुद्द्यांवर चर्चा

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजित संविधानिक मूल्ये, शाश्वत विकास ध्येय, मानव विकास निर्देशांक व युवा विकास या विषयांवर आधारित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे पॅट्रॉन प्रो. डॉ. सुरेश गोसावी, प्रो. डॉ. पराग काळकर, प्रमुख पाहुणे मा. आरती अहिवळे व सन्माननीय पाहुणे प्रसिद्ध उद्योजक श्री सागर अहिवळे, विशेष अतिथी पार्थ बीश्वास विश्वास, अध्यक्ष प्रो. डॉ. विलास आढाव व विशेष सहकार्य प्रो. डॉ. गीता शिंदे यांचे लाभले

सामाजिक-आर्थिक मुद्द्यांवर चर्चा करताना, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी पर्यावरण, पाण्याचे प्रश्न, त्याची गुणवत्ता आणि योग्य वापर, डऊॠयावरही भर दिला. राष्ट्र उभारणीच्या सर्व सहा क्षेत्रांवर म्हणजेच शिक्षण, आरोग्यसेवा, रोजगार, शांतता आणि सुरक्षा, समानता आणि समावेशन, नागरी आणि राजकीय सहभाग यावर विशेष उल्लेख करून 'राष्ट्र निर्माण' माहितीपटाचे कौतुक केले. एसडीजी म्हणजे निसर्ग आणि मानवाचे सहअस्तित्व. जर षेर्ली ळी ीशर्वीलशव, लक्ष कमी केले तर ते आपल्या जीवनावर परिणाम करणारे संतुलन बिघडवते. आपण शाश्वत विकास ध्येयांसाठी हिरवळीच्या आच्छादनावर, रोजगाराच्या संधींवर देखील काम केले पाहिजे. शिक्षण आणि माहितीपटांच्या माध्यमातून ते लागू केले पाहिजे आणि पुढील पिढीच्या चांगल्या स्थितीसाठी काही एसडीजी ध्येयांमध्ये प्रभावीपणे सकारात्मक परिणाम करणारे योगदान दिले पाहिजे.

आंतरराष्ट्रीय ईपीडी तज्ञ आणि ग्रीननेक्स एन्व्हायर्नमेंटलच्या प्रसिद्ध उद्योजिका, सौ आरती अहिवळे यांनी मानवांवर आणि पर्यावरणावर कार्बनचा प्रभाव कसा कमी करायचा याबद्दल मार्गदर्शन केले. यांनी औद्योगिक क्रांती आणि त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम याबद्दल बोलले. विविध प्रकारचे प्रदूषण आणि जागतिक तापमानवाढ, उत्पादन निर्मितीसाठी नैसर्गिक संसाधनांचा बेसुमार वापर झाल्यामुळे निसर्गावर होणारा परिणाम झाले आहे. वर्ष २०१२ मध्ये फक्त २ कर्मचाऱ्यांपासून सुरू झालेल्या ह्या कंपनीत आता ३५० कर्मचारी आहेत. पॅरिस करार अंतर्गत कार्बन न्यूट्रल २०७० पर्यंत करण्यासाठी मुबलक स्व-रोजगार रोजगार आणि नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत.

सन्माननीय पाहुणे: प्रसिद्ध उद्योगपती श्री सागर अहिवळे यांनी ग्रीन सोल्युशन कंपनी पाणी, प्लास्टिक हवा आणि प्रदूषणातून कार्बन आणि इतर हरितगृह वायू उत्सर्जन कमी करण्यास कशी मदत करते याबद्दल माहिती दिली. त्यांनी या क्षेत्रातील विविध करिअर, बाजार संशोधन आणि अनेक नोकरीच्या



संधींबद्दल मार्गदर्शन केले. पर्यावरण संवर्धन, हरित इमारत प्रमाणपत्र, प्लास्टिक पुनर्वापर, या क्षेत्रात नोकरीच्या संधींसाठी आवश्यक असलेली कोणतीही विशिष्ट पात्रता नाही यावर प्रकाश टाकला, त्यात प्रचंड ेिक्षसरी संधी आहेत. एड्ॠ अहवाल, वृक्षारोपण आणि पर्यावरण सहाय्यक उपक्रमांमुळे कार्बन क्रेडिट बँक, क्लेमळपस कार्बन क्रेडिट, शाश्वत शेती लहश महत्त्व सांगितले . विशेष पाहुणे इंडियन एक्सप्रेसचे सहाय्यक संपादक श्री पार्थ यांनी हवामान बदल, काँक्रीटीकरणामुळे वाढत्या तापमानाचा तरुणांवर आणि भावी पिढीवर परिणाम होत आहे यावर चिंता व्यक्त केली. आपण वातावरणात आणि शहरी काँक्रीटीकरणात आपण पर्यावरणावर आणि शहरी काँक्रिटीकरणामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. भारतीय संविधान आणि झरीीं ४ - उ्झड्झ वर लक्ष केंद्रित केले पाहिजे आणि सांगितले की आपल्या वैयक्तिक वर्तन आणि सवयींच्या पातळीवरही शाश्वत विकास ध्येयांवर काम करणे खूप महत्वाचे आहे.प्राध्यापक डॉ. अंजली कुराणे यांनी माहितीपटाच्या भागात पुनरुच्चार केला की भारत हा एक तरुण राष्ट्र आहे जिथे बहुसंख्य लोकसंख्या ३५ वर्षांपेक्षा कमी आहे. देशाच्या प्रगतीसाठी आपण त्यांची कौशल्ये, प्रतिभा, ऊर्जा आणि सर्जनशीलता वापरण्यासाठी इको सिस्टम तयार केली पाहिजे. एम्पॉवर चॅरिटेबल ट्रस्टचे संचालक श्री. विनय दवे यांनी त्यांच्या सत्रात राष्ट्र उभारणी म्हणजे युवा विकास निर्देशांक आणि पर्यावरणीय कामगिरी निर्देशांक (एझख), डऊॠआणि कञ्ख मध्ये आपल्या देशाचा दर्जा सुधारणे हा मुद्दा विशेषतः स्पष्ट केला. त्यांनी 'भारतीय संविधान' मध्ये समाविष्ट असलेल्या तत्त्वांवर प्रकाश टाकला, म्हणजेच न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता. आपल्या राष्ट्राला जगातील शीर्ष ३० आनंदी राष्ट्रांमध्ये स्थान मिळवून देण्यासाठी तरुणांना काम करण्यास प्रेरित केले. श्री. विनय दवे यांनी माहितीपठाद्वारे भारतीय संविधानातील प्रमुख उद्दिष्टे विस्तृत स्वरूपात मांडली यामुळे विद्यार्थी प्रेरित झाले. सहभागींना हा माहितीपट अत्यंत माहितीपूर्ण आणि प्रेरणादायी वाटला. या माहितीपटामुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली आणि त्यांनी अशा राष्ट्रनिर्माण सत्रांचे आयोजन करण्याची विनंती केली. तरुणांनी समाज आणि राष्ट्रासाठी योगदान देण्याची इच्छा व्यक्त केली. प्राध्यापक डॉ. संगीता साळवे यांनी 'पे बॅक - टू सोसायटी' या मुद्द्याचा आणि त्यांच्या फाउंडेशनने केलेल्या कामाचा उल्लेख केला.कार्यक्रमाचे अध्यक्ष भाषण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षण शाळेचे संचालक प्रा. डॉ. विलास आढाव यांनी बहुविधता आणि विविधतेचे महत्त्व यावर केला. आपण नैसर्गिक लोकसंख्याशास्त्रीय विविधतेसह लोकसंख्येतील एकतेचे राष्ट्र आहोत. आपल्याकडे राजकीय लोकशाही असली तरी, म्हणजेच एक व्यक्ती एक मूल्य मत, आपल्याला सामाजिक आणि आर्थिक समानता देखील आवश्यक आहे. सर्व नागरिकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी समावेशकतेला प्रभावीपणे प्रोत्साहन देण्यासाठी आणि एकत्रितपणे काम करण्यासाठी नितांत आवश्यकता आहे. डॉ. आढाव यांनी चिंता व्यक्त केली की संविधानातील अनेक मूल्यांची पूर्ण फलनिष्पत्ती अद्याप झालेली नाही, 'भारताचे संविधान', संवैधानिक मूल्ये आणि संवैधानिक नैतिकतेचा प्रसार आणि संवैधानिक साक्षरता कार्यक्रमांवर काम करणे ही तातडीची गरज आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. कपिल नरवाडे आणि डॉ. सारिका तोरवणे यांनी केले. सूत्रसंचालनाच्या सोबतच डॉ. सारिका यांनी कार्यक्रमाचे नियोजन, व्यवस्थापन आणि यशस्वी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली .

कार्यक्रमाला विशेष सहकार्य, शिक्षण आणि विस्तार विभागाच्या प्रमुख प्राध्यापिका डॉ. गीता शिंदे यांनी केले.याप्रसंगी अशोक प्रियदर्शी, प्रशांत प्रबोध, संजय चव्हाण, डॉ. वैशाली खोब्रागडे, अँड. त्रिरत्न, हेमंत गायकवाड, निखिल रोहिणीकर, उमेश साळवी इत्यादींचा सत्कार करण्यात आला.सर्व वक्त्यांनी या माहितीपटाचे कौतुक केले आणि देशभरातील विद्यापीठे, महाविद्यालये, संस्था आणि कंपन्यांमधील तरुणांना तो दाखवावा, प्रत्येक व्यक्तीमध्ये सामाजिक, नैतिक आणि संवैधानिक मूल्ये रुजवावीत, ज्यामुळे एक अत्यंत समृद्ध आणि सुसंवादी राष्ट्र निर्माण होईल यावर भर दिला.एम्पॉवर चॅरिटेबल ट्रस्टचे संचालक श्री. विनय दवे यांनी आभार मानले. भावना लाटे, निशा जाधव, दीपिका पवार, ऋषिकेश दराडे, शिवम पाल, सूर्यवंशी क्षितिज, शुभम यादव, गौरव महाजन, गौरव. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. समाधान फुगे आणि डॉ. गायत्री चौकडे, हर्षदा आणि आयुष यांनी कठोर परिश्रम घेतले.

पान एक वरून

**ठाकरेंची शिवसेना शिल्लकही**

आणि व्यवहारामुळे लोक त्यांच्या विचारापासून दूर गेले. त्यामुळे काँग्रेस जवळपास संपुष्टात आली, तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) संपली आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना पुढच्या निवडणुकीपर्यंत राहत नाही, असं रावसाहेब दानवे यांनी म्हटलं आहे.भाजपा नेते नारायण राणे यांनीही आज माध्यमांशी संवाद साधत उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. नारायण राणे म्हणाले की, तुम्ही चांगल्या दिवशी नको त्या माणसाचं नाव घेता. विकास, समृद्धी, लोकहित हे उद्धव ठाकरेंचं काम नाही. शिव्या घालणं आणि चांगल्या कामात व्यत्यय आणणं हे उद्धव ठाकरे यांच काम आहे, अशा शब्दांत नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. राणे पुढे म्हणाले की, त्यामुळे त्यांचा (उद्धव ठाकरे) पक्ष आवळत चालला आहे. पुढच्या निवडणुकीपर्यंत हा पक्ष राहत नाही. मी ३९ वर्ष त्यांच्याबरोबर काम केलं आहे. माननीय बाळासाहेब ठाकरे होते तेव्हा पक्ष होता. पण बाळासाहेब ठाकरे गेले आणि शिवसेना संपली, अशी टीका नारायण राणे यांनी केली आहे.

**हापूस आंब्यांवरून होणारी**

उत्पादक कंपन्यांनी त्यांच्या खरेदीदारांना ते खरेदी करत असलेल्या फळांच्या गुणवत्तेची खात्री करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. रिजनल रूट्स प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक निशिकांत पाटील आणि हर्षल जरांडे म्हणाले की ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील २१ शेतकऱ्यांकडून आणि रत्नागिरी जिल्ह्यातील १२ शेतकऱ्यांकडून हापूस आंबा खरेदी करत आहेत.आमचे उद्दिष्ट शेतकरी आणि ग्राहकांमधील अंतर कमी करणे आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचे मूल्य मिळायला हवे आणि ग्राहकांना सर्वोत्तम उत्पादन मिळणे गरजेचे आहे, असं ते म्हणाले. कंपनीचे म्हणणे आहे की त्यांच्या बॉक्समध्ये ठठ कोड आहेत. यामुळे ग्राहकांना आंबा जिथून घेतला जातो त्या बागेची माहिती मिळते. महाएफपीसीच्या आंबा महोत्सवात, पेट्यांमध्ये संपूर्ण ट्रेसेबिलिटी असते, यामध्ये कापणीची तारीख आणि पॅकिंग सारख्या तपशीलांचा समावेश असतो आणि त्यांच्या क्यूआर कोड एन्क्रिप्टेड असतो. महाएफपीसीचे व्यवस्थापकीय संचालक योगेश थोरात म्हणाले की, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांना चांगला भाव मिळावा यासाठी आमचे ध्येय आहे.

**स्वच्छता गृहासाठी ठेवलेले**

पाणी विकत घ्यावे लागत आहे खाजगी पाणी विक्रेत्याच्या आर्थिक लाभासाठी गोरगरीब रुग्ण व नातेवाईकांची ठरवून आर्थिक पिळवणूक होत असताना वार्डात पिण्याचे पाणी नाही यासंदर्भात उपाययोजना करण्याची वार्ड इनचार्ज पासून विभाग प्रमुख तसेच वैद्यकीय अधीक्षक उपअधीक्षक यांची काहीच जबाबदारी नाही का ? रुग्णालय परिसरात अनेक ठिकाणी जलकुंभ शोभेच्या वस्तू म्हणून उभे आहेत काही ठिकाणी थोडावेळ पाणी येते इतर वेळेला तहान भागवण्यासाठी रुग्णाच्या नातेवाईकांना मेडिकल कॅन्टीनमध्ये तसेच ऑटो पॉईंट वर जाऊन पैसे मोजून बाटलीभर पाणी आणावे लागते पुन्हा तीच पायपीट ज्या रुग्णाकडे नातेवाईक नाही त्यांनी काय करायचे असा प्रश्न नागरिकांना पडला आहे नागरिकांन मध्ये चर्चा सत्र सुरू झाले आहे.

**मंत्री कदमांचा मोबाईल चोरी**

खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे हे देशमुख कुटुंबीयांना मदतीचा एक हात म्हणून स्वतःच्या हक्काचे घर बांधून देत आहेत. देशमुख कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी तसेच त्यांना बांधून देत असलेल्या घराच्या बांधकामाची पाहणी करण्यासाठीवारंवार शिवसेनेचे विविध नेते, मंत्री मस्साजोग येथे येऊन भेट देत आहेत. घडलेली घटना अत्यंत साधारण होती. मात्र विरोधकांनी गृह राज्यमंत्री योगेश कदम यांचा मोबाईल चोरीला गेल्याच्या अफवांचे वावडळ आणले असून सोशल मीडियावर बीडची बदनामी करणे सुरु केले आहे. विरोधकांनी अफवा पसरवने बंद करावे आणि बीडची बदनामी थांबवावी असे आवाहन शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी प्रसार माध्यमांमध्ये पत्रक जाहीर करून केले आहे.

**बीडमध्ये फुले आंबेडकर**

या विषयावर परिसंवादाचे आयोजित केला आहे. या परिसंवादास वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष तथा मुख्य संयोजक अनिल डोंगरे यांच्यासह डॉ.बाळासाहेब जावळे, ड. राजेश शिंदे, ड. तेजस वडमारे यांनी केले आहे.

पान सहा वरून

**भाईचारे की जिंदा मिसाल है पप्पू**

गोवर्धन वाघमारे, महेश आठवले, मायाताई मिसळे, रेश्माताई जोगदंड, अरुणाताई आठवले, नाना मस्के, अविनाश जोगदंड, भैय्यासाहेब मस्के, सुभाष तांगडे, प्रभाकर चांदणे, सतिष शिनगारे, धम्मा पारवेकर, नामदेव वाघमारे, शाम वीर, भैय्यासाहेब साळवे,अक्षय कोकाटे, भाऊसाहेब दळवी, ड.श्रीकांत साबळे, महेंद्र वडमारे, सचिन वडमारे, यांच्यासह विविध पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजू जोगदंड, मझरखान, रमेश गंगाधरे, सय्यद जफर, सादेक पठाण किसन तांगडे, रफिक भाई फिटर, शेख रोहिल रफीख, सुलतान बाबा, सिद्धीक फारुखी, फरहान बागवान, रणजीत शिनगारे आदींनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड.सुरेश वडमारे यांनी केले.

**शालेय बस झाडावर**

चालक झाडावर जाऊन आदळली. या अचानक घडलेला अपघात इतका भयानक होता की बसमधील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात घाबरले. या अपघातात बस चालकासह चार ते पाच विद्यार्थी किरकोळ जखमी झाल्याची माहिती पोलिसांकडून मिळाली आहे. यापैकी जखमींना आष्टीच्या ग्रामीण रुग्णालयात तर काहींना खासगी रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. नेमका अपघात कसा झाला याबाबत पोलिस तपास करत असून, अपघातस्थळी पोनि शरद भूतेकर, पोकॉ बिबीशन गुजर, सचिन पवळ, विलास गुंडाळे, उदावंत आदीनी तात्काळ भेट दिली.

**परळीत भाजपाचा स्थापना**

स्थापना दिवसाच्या शुभेच्छा दिल्या. दुपारी २ वा. कार्यालयात संघटन पर्व अंतर्गत मोठा स्क्रीन लावून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाचा कार्यकर्त्यांनी लाभ घेतला. यावेळी सतीश मुंडे, जुगलकिशोर लोहिया यांच्यासह प्रकाश जोशी, राजेश्वर देशमुख, महादेव इटके, राजेंद्र ओझा, नितीन समशेट्टे, मोहन जोशी, अनिश अग्रवाल, बंडू कोरे,अच्युत जोगदंड, चंदाताई ठोंबरे, राजेश कौलवार, सुशील हरंगुळे, अभिमान मस्के, विकास हालगे, मिलिंद कांबळे आदींसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

**कडा येथे राम नवमी**

प्रसादाचे वाटप करण्यात आले. आज सोमवार दि. ७ एप्रिल रोजी गुरुवर्य मदन महाराज संस्थानचे अध्यक्ष हभप बबन महाराज बहिरवाल यांच्या काल्याच्या कीर्तनाने व त्यानंतर महाप्रसादाने या सप्ताहाची सांगता होणार आहे.

**पशुवैद्यकीय दवाखान्यातील**

चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले व शासनाचा पगार घेऊन एकही दिवस दवाखान्यात हजर नाही राहणाऱ्या चिंचोली माळी येथे कार्यरत असलेले डॉक्टरवर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत भावना व्यक्त केल्या जात आहेत .

**रस्त्यांची साईड पट्टी न भरल्याने**

काम स्नेहस हायडल प्रा.ली कळंब या कंपनीने घेतला असून प्रत्यक्षात हा रस्ता सन २०२२/२३ पूर्ण करायला पाहिजे होते पण त्या कालावधी मध्ये रस्ता पूर्ण न करता २६ नोव्हेंबर रोजी आम्ही दैनिकात बातमी प्रसिद्ध केल्यानंतर १० डिसेंबरला काम चालू करुन कासव गतीने हा रस्ता सन २०२३/२४ मध्ये पूर्ण केला पण साईड पट्टीचे काम का केले नाही? असाही प्रश्न नागरिकांमधून उपस्थित होत आहे तरी या कंपनीचे जे कोणी ठेकेदार असतील आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी तात्काळ पावसाळ्याच्या अगोदर साईड पट्ट्याचे चांगल्या प्रकारे काम करावे असे ग्रामस्थ व वाहनचालका मधुन बोलले जात आहे या रस्त्याच्या साईड पट्ट्याच्या कामाला कधी सुरुवात होईल? कधी पूर्ण होईल? या अपेक्षेने ग्रामस्थ व प्रवासी आणि वाहन चालक प्रतीक्षेत आहेत ठेकेदार यांनी या रस्त्याच्या साईड पट्ट्याच्या कामाला पावसाळ्याच्या अगोदर सुरुवात करावी अशी मागणी होत आहे.

**महापुरुष सामान्य ज्ञान**

या स्पर्धेचे प्रस्ताविक प्रा.अशोक गायकवाड, सूत्रसंचालन ड.राजेश शिंदे, आभार सचिन वडमारे यांनी केले. स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने सुयोग्य नियोजन केले होते.जयभिम महोत्सवातील कार्यक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122

Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# वक्फ बोर्डाचा बुरखा गळाला!



स्टेटलाइन

डॉ. सुकृत खांडेकर

वक्फ सुधारणा विधेयक हे संसदेच्या दोन्ही सभागृहांत बहुमताने मंजूर झाले आणि वर्षानुवर्षे वक्फ व्यवस्थापनाच्या चालू असलेल्या मनमानी व भ्रष्ट कारभाराला लगाम घालण्याचा मार्ग मोकळा झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे देशाचे नेतृत्व असल्यामुळेच हे शक्य झाले. वक्फ सुधारणा विधेयक हे मोदी सरकारच्या तिसऱ्या कारकिर्दीतील आजवरचे सर्वात मोठे यश म्हणावे लागेल. लोकसभेत २८८ विरुद्ध २३२ आणि राज्यसभेत १२८ विरुद्ध ९५ अशा मतांनी वक्फ सुधारणा विधेयक मंजूर झाले. दोन्ही सभागृहांत बारा-बारा तासांहून अधिक काळ धारदार चर्चा व गरमा गरम वादविवाद झाले. दोन्ही सभागृहांत मध्यरात्री अडिचनंतर या विधेयकावर मतदान झाले. नरेंद्र मोदी देशाच्या सर्वोच्च पदावर आल्यापासून देशाचा नूर तर बदलला आहेच पण देशाचा चेहरा-मोहराही वेगाने बदलत आहे. सर्व जाती-धर्मातील लोकांना एक विश्वासक नेतृत्व लाभले आहे. मोदी सरकारने अयोध्येत भव्य राम मंदिर उभारले, जम्मू-काश्मीरला घटनेतील ३७०व्या कलमाद्वारे मिळालेला विशेषाधिकार रद्द केला व तेथील जनतेला देशाच्या मुख्य प्रवाहात आणले, सीसीए आणून घुसखोरांना लगाम घालण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले, तिहेरी तलाक रद्द करून देशातील लक्षावधी मुस्लीम महिलांना मोठा दिलासा व विश्वास दिला, लोकसभा व विधानसभांमध्ये तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारा कायदा करून महिलांना सन्मान दिला, प्रयागराजला महाकुंभमध्ये ६५ कोटी भाविकांनी गंगेत पवित्र स्नान करून जागतिक विक्रम निर्माण केला आणि आता देशातील तिसऱ्या क्रमांकाचा जमीन मालक असलेल्या वक्फ बोर्डाच्या कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी वक्फ सुधारणा विधेयकावर संसदेची बहुमताची मोहर उठविण्यात मोदी सरकारने बाजी मारली. मोदी है तो मुमकीन है, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले.

वक्फ म्हणजे मुस्लिमांनी आपल्या संपत्तीचा काही वाटा लोककल्याणासाठी दान करणे. वर्षानुवर्षे वक्फ बोर्डाची संपत्ती आणि मालमत्ता कोटी कोटीने वाढत आहे आणि देशातील सामान्य मुस्लीम मात्र गरीबच राहतो आहे. एकीकडे वक्फ बोर्ड गर्भश्रीमंत होत आहे आणि दुसरीकडे त्यांच्याच जमिनीच्या झालेल्या गैरव्यवहारातून उत्तुंग इमारती आणि पंचतारांकित हॉटेल्स देशात उभी राहिलेली दिसत आहेत. वक्फ बोर्डाच्या मालमत्तेत सतत होणारी वाढ खूप गूढ आहे. देशातील अनेक सरकारी व निमसरकारी जमिनींवर वक्फ बोर्डाने कब्जा केला आहे. अनेक मंदिरे व हिंदूंच्या मालमत्तांवर वक्फ बोर्डाने आपला हक्क दाखवला आहे. एवढेच काय पण आग्र्यातील ताजमहाल व दिल्लीतील संसद भवनावरही वक्फ बोर्डाने ही जागा आमचीच आहे असा दावाही केला आहे. हिमाचल प्रदेशात वक्फने तेथील शेकडो एकर जमिनीवर दावा केला व तेथे मशीद उभी राहिली आहे. उत्तर रेल्वेची जमीन वक्फने दावा करून बळकावली आहे. महाराष्ट्रात बीड व कोल्हापूर जिल्ह्यात मंदिरांची जमीन वक्फच्या ताब्यात आहे. वक्फच्या मालमत्तेवर दिवाणी कोर्टात दावा करता येत नाही. केंद्रात व राज्यात वर्षानुवर्षे सत्तेवर असलेल्या काँग्रेस पक्षाने नेहमीच वक्फ बोर्डाला झुकते माप दिले, एवढेच नव्हे तर २०१४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी केंद्रातील यूपीए सरकारने वक्फ बोर्डाला १२३ मालमत्ता देऊन टाकण्याचाही पराक्रम केला. मेरी मर्जी, अशा मनमानी भूमिकेतून वक्फ बोर्डाचा देशात कारभार चालू होता. काँग्रेस, सपा, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, एआयएमआयएम आदींचा विरोध झुगारून मोदी सरकारने वक्फ सुधारणा विधेयक संमत करून दाखवले आहे.

वक्फ बोर्डाच्या मालकीची जमीन व मालमत्ता दोन लाख कोटींहून अधिक असताना सामान्य मुस्लीम गरिबीत का जगतो आहे? मुस्लिमांच्या मुलांना चांगले शिक्षण का मिळत नाही? मुस्लिमांना चांगले प्रशिक्षण व उत्तम रोजगार का नाही? प्रत्येक राज्यात वक्फ बोर्ड आहे पण त्याला आपल्या समाजाकडे लक्ष द्यायला वेळ नाही.

वक्फ सुधारणा विधेयक म्हणजे देशातील मुस्लिमांचा अवमान आहे, त्यांना दुय्यम नागरिकत्व देण्याचा प्रकार आहे असा आरोप करून असदुद्दीन ओवेसी यांनी विधेयकाची प्रत लोकसभेत फाडली. म. गांधींचे नाव घेऊन त्यांनी सरकारचा निषेध केला. पण ओवेसींना इतक्या वर्षात वक्फ बोर्डातील भ्रष्टाचार व मनमानी कारभार कधी दिसला नाही का? मुस्लीम समाजात फूट पाडण्यासाठी सरकारने खेळी खेळली आहे, असा आरोप सपाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी केला. १९९५ व २०१३ मध्ये वक्फ सुधारणा विधेयक संसदेत आणले होते तेव्हा भाजपाचे लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी, सिकंदर बख्त, सुषमा स्वराज, अरुण जेटली, मुख्तार अब्बास नकवी यांनी त्याला पाठिंबा दिला होता. मग भाजपाचे हे सर्व दिग्गज तेव्हा चुकीचे वागले असे मोदी सरकारला म्हणायचे आहे का, असा प्रश्न विरोधी पक्षांनी संसदेत विचारला. जर वक्फ कायदा वाईट असता तर या सर्व भाजपा दिग्गजांनी त्यावेळी त्याचे समर्थन का केले? एवढा वाईट कायदा बदलण्यासाठी मोदी सरकारला ११ वर्षे का वाट पाहावी लागली? अशीही विचारणा विरोधी पक्षांनी केली.

उत्तर प्रदेशात वक्फ बोर्डाची जमीन २ लाख ३२ हजार ४४७ एकर आहे, पंजाबमध्ये ७५,९६५, पश्चिम बंगालमध्ये ८०,४८०, केरळ ४३,२८२, गुजरात ८९,९४०, तामिळनाडू ६६,०९२, तेलंगणात ४५,६८२, कर्नाटकात ६२,८३० एकर जमीन आहे. महाराष्ट्रात वक्फ बोर्डाकडे ९३ हजार एकर जमीन असावी पण त्यातील ६० टक्के क्षेत्रावर अतिक्रमण आहे असे सांगितले जाते. वाढता वाढता वाढे अशी वक्फ बोर्डाची मालमत्ता दरवर्षी वाढते आहे. पण त्यावर कोणाचे नियंत्रण नाही, उत्तरदायित्व नाही. खासगी खरेदी-विक्री व्यवहारावर कोणाची देखरेख नाही. मग केंद्र सरकारने वक्फ बोर्डाच्या कारभारात, कायद्यात सुधारणा करून शिस्त आणि पारदर्शकता आणली तर त्याविरोधात थयथयाट कशासाठी?

वक्फ सुधारणा विधेयकाला विरोधी पक्षांनी सर्व काही पणाला लावून विरोध केला. सरकारला कोणाच्याही धार्मिक भावना दुखवायच्या नाहीत, गरीब मुस्लिमांना न्याय मिळावा हे सुधारणा विधेयकामागे उद्दिष्ट आहे असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी वारंवार स्पष्ट केले. वक्फमध्ये गैर मुस्लिमांना परवानगी दिली जाणार नाही, असेही सांगितले. वक्फ मालमत्ता हा धार्मिक विषय नाही. त्यामुळे हिंदू मंदिरांची तुलना वक्फ बोर्डाशी करणे योग्य नाही. प्रशासकीय व्यवस्थेमध्ये पारदर्शकता असावी हा या विधेयकाचा हेतू आहे. यापुढे वक्फ कारभारात नोंदणी, लेखा, लेखा परीक्षण करावे लागेल. सरकारी मालमत्ता परत करावी लागेल. डिजिटल नोंदी कराव्या लागतील. यापुढे शिया सुन्नी बोहरा सर्व वक्फ बोर्डात असतील असे रिजिजू यांनी स्पष्ट केले.

भाजपाचे धर्मनिरपेक्ष मित्र असलेल्या नितीश कुमार यांच्या जनता दल (युनाटेड), चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगू देशम, चिराग पासवान यांचा लोकजनशक्ती व मा[...] पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्या जनता दल (सेक्युलर[...]) यांनी वक्फ सुधारणा विधेयकाला पाठिंबा दिला.




गेल्या वर्षी वक्फ सुधारणा विधेयक संसदेच्या संयुक्त चिकित्सा समिती (जेपीसी)कडे पाठवले होते. जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीत दोन्ही सदनाचे सर्व पक्षीय ३१ सदस्य होते. या समितीच्या ३६ बैठका झाल्या. समितीत २०० तासांहून अधिक काळ चर्चा झाली. जगदंबिका पाल हे संपूर्ण समितीसह देशात १० ठिकाणी गेले. २८४ भागधारकांनी समितीपुढे आपली भूमिका मांडली. देशातून विधेयकावर एक कोटी सूचना आल्या होत्या. त्यांचा अभ्यास करून समितीने अहवाल सादर केला.

आग्र्याच्या ताजमहालवर वक्फ बोर्डाने दावा केला ते[...] सर्वोच्च न्यायालयाने शहांजहांच्या काळातला आदेश घेऊ[...] या असे वक्फला सांगितले, अशीही आठवण यानिमित्ताने पुढे आली. गुजरातमध्ये दंगली झाल्या तेव्हा अमित शहा तेथे गृहमंत्री होते असा आरोप काँग्रेसचे दिग्विजय सिंग य[...] केला तेव्हा राज्यसभेत उपस्थित असलेले शहा म्हणाले, दंगलीच्या काळात मी गृहमंत्री नव्हतो. दंगल शांत झाल्या अठरा महिन्यांनी मी गृहमंत्री झालो.

वक्फ बोर्ड कोणतीही जागा आपली कशी म्हणू शकते भारतात काही कायदा, नियम आहेत ना? जर आम्ही रेल्वे गाडीत किंवा विमानात नमाज पढला तर ती ट्रेन किंवा विमान आमचे होते काय? असा प्रश्न एका मुस्लीम खासदारानेच विचारला.

सन २००६ मध्ये सच्चर समितीचा अहवाल आला. त्यात म्हटले होते की, वक्फ बोर्डाचा कारभार डिजिटल झाला पाहिजे. वक्फकडे ४ लाख ९० हजार मालमत्ता आ[...] व उत्पन्न १६३ कोटी आहे. जर उत्तम व्यवस्थापन केले तर बारा हजार कोटी उत्पन्न मिळू शकेल. आता वक्फ बोर्डाकडे ८ लाख ७२ हजार मालमत्ता आहेत. सच्चर समितीच्या निकषानुसार उत्तम व्यवस्थापन असेल तर कि[...] उत्पन्न मिळू शकेल, मार्केट रेट मोजा असा सल्लाही चर्[...] एका ज्येष्ठ सदस्याने दिला.

***केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी म्हटले***
***नरेंद्र मोदी है, मुसलमानों के सच्चे वाली***
***खरगेसाहब बजावं जोरदार टाली,***
***मत दे दो मोदी जी को गाली,***
***नहीं तो खुर्सी करो खाली***
***विरोधी दलों की रात हो गयी काली***
***नड्डासाहब तुम बजावं टाली... (हंशाच हंशा)***


sukritforyou@gmail.co[...]
sukrit@prahaar.co.[...]


# मराठीचे वैभव



मायभाषा

डॉ. वीणा सानेकर

अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणून आनंद उधळून झाला. अभिमान बाळगून झाला. उत्सव उदंड झाले. वेळ ठेपली आहे मराठी भाषक म्हणून स्वतःला सिद्ध करण्याची! आपली जबाबदारी घेण्याची.

भाषा जितकी जास्त वापरली जाईल तितकी ती अधिक समृद्ध होत जाते.

आपण मराठीचा वापर जितका कमी कमी करत जाऊ, तितके आपण तिला अधिकाधिक दुबळे करत जाऊ, हे आपण ओळखायला हवे आणि हे चित्र शहरामध्ये अधिक स्पष्ट दिसते. खरे तर कोकण, मराठवाडा, वऱ्हाड अशा वेगवेगळ्या भागातील लेखक त्या त्या प्रदेशातील समाज जीवनाचे चित्रण करीत आहेत. भिल्ल, वारली, कोरकू, गोंड अशा भिन्न भिन्न समाजगटातील लोकांचे जीवन व्यक्त होणे गरजेचे आहे. केवळ अभिजात वर्गाची भाषा श्रेष्ठ नव्हे. प्रमाण भाषा जितकी श्रेष्ठ तितकी बोली भाषा श्रेष्ठ होय. अभिजात भाषेच्या जतन संवर्धनात बोली भाषांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे.

त्या त्या बोली भाषेतील म्हणी, वाक्प्रचार, लग्नगीते, स्त्रीगीते, सण आणि उत्सवांची गीते यांचा अभ्यास आणि संशोधन म्हणजे एका अर्थी सांस्कृतिक संचिताची जपणूक होय.

अलीकडेच मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे सर्वोत्कृष्ट प्रबंधाचा पुरस्कार डॉ. नेहा सावंत यांना मिळाला. सामवेदी ख्रिस्ती बोली म्हणजे कुपारी बोलीचा चिकित्सक अभ्यास त्यांनी केला आहे. बोली अभ्यासाच्या अत्यंत सूक्ष्म पैलूवर त्यांनी काम केले आहे. त्यासाठी वसई आणि आसपासच्या भागात सर्वेक्षण, मुलाखती अशा संदर्भसाधनांचा त्यांनी उपयोग केला. एखाद्या बोलीचा अभ्यास करणे हे चिकाटीचे काम. संवाद, संपर्क, प्रत्यक्षात ती बोली बोलणारा समाज शोधून त्या समाजाचा अभ्यास करणे हे सर्व अशा प्रकारच्या संशोधनात महत्त्वाचे ठरते.

माझी एक विद्यार्थिनी डॉ. समृद्धी म्हात्रे हिने आगरी गीतांना केंद्रस्थानी ठेवून पीएच. डी. पदवीकरिता संशोधन केले. आगरी स्त्री गीतांचे कितीतरी मोठे विश्व आहे. हे भांडारच तिने या प्रबंधात एकत्रितपणे समोर आणले.

मध्यंतरी माझ्या वाचनात असा संदर्भ आला की, शैलजा मेनन आणि रामचंद्र कृष्णमूर्ती यांनी कन्नड आणि मराठी या दोन भाषांतील अध्ययन अध्यापनाबाबत केलेल्या अभ्यासावरून खालील निष्कर्ष मांडले.

१) शिक्षणक्षेत्रात किंवा पाठ्य पुस्तकात मुलांच्या मौखिक भाषा आणि बोलींना स्थान नाही.

२) मुले वर्गात त्यांची बोली वापरतात तेव्हा शिक्षक त्यांना संवेदनशीलपणे प्रतिसाद देतातच असे नाही.

हे निष्कर्ष खूप काही सांगणारे आहेत. मुलांनी बोलीचा वापर वर्गात केला की त्या कनिष्ठ असल्याची किंवा त्यावरून त्यांना हिणवण्याची उदाहरणे घडताना दिसतात. मात्र आज ग्रामीण आदिवासी भागात शिक्षक प्रसिद्ध कवितांचे बोलीतून अनुवाद करून घेत असल्याचे कानी येते तेव्हा त्या शिक्षकांच्या कल्पकतेला दाद द्यावी वाटते.

बोलीतील शब्दांचा कोश मुलांकडून एकत्रितपणे करवून घेण्याचा उपक्रमदेखील त्यांना देता येईल. दर बारा कोसांवर भाषा बदलते असे म्हणतात आणि हेच तर मराठीचे वैभव आहे.



# हिजाब परिधान करणारी पहिली मॉडेल



दी लेडी बॉस

अर्चना सोंडे

बहुतांश मुस्लीम समाजात स्त्रीला एक उपभोग्य वस्तूच समजले जाते. मध्ययुगीन काळातील कायदे तिच्यासाठी वापरले जातात. स्त्री म्हणजे जणू पुनरुत्पादनाचे साधन मानले जाते. ज्या मुस्लीम स्त्रिया याच्याविरोधात आवाज उठवतात त्यांना भर चौकात चाबकाचे फटके दिले जातात किंवा देहदंडाची शिक्षा केली जाते. तिच्या बाबतीत मात्र वेगळं घडलं. आपल्याच देशातील गृहयुद्धामुळे तिला निर्वासित म्हणून दुसऱ्या देशात जावं लागलं. मात्र तिने आपली नितीमूल्ये सोडली नाहीत आणि तरीसुद्धा जगविख्यात झाली. ही गोष्ट आहे, सोमाली अमेरिकन मॉडेल हलिमा एडनची. जी मोठ्या ब्रँड्ससाठी हिजाब परिधान करून रॅम्पवॉक करणारी पहिली मॉडेल म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध झाली.

हलिमा एडनचा जन्म १९९७ मध्ये केनियातील एका निर्वासित छावणीत झाला होता. तिचे पालक सोमाली गृहयुद्धातून पळून गेले होते. हलिमा फक्त सहा वर्षांची असताना अमेरिकेत जाण्यापूर्वी तिचे कुटुंब छावणीत आश्रय घेत होते. कालांतराने हलिमाचे कुटुंब सेंट क्लाऊड, मिनेसोटा येथे स्थायिक झाले. हे एक लहान शहर आहे जिथे सोमाली स्थलांतरितांची संख्या लक्षणीय होती.

एक स्थलांतरित म्हणून, हलिमाला मोठ्या आव्हानांना तोंड द्यावे लागले. तिला तिच्या सोमाली असण्यामुळे आणि हिजाब घालण्याच्या निर्णयामुळे शाळेत अनेकदा छळले जात असे. धमकावले जात असे. हलिमाला सांस्कृतिक संघर्षांचाही सामना करावा लागला. तिच्या सोबतच्या मित्र-मैत्रिणींसोबत जुळवून घेण्याचा प्रयत्न करताना अवघड जाई. अमेरिकन संस्कृती स्वीकारणे आणि स्वतःच्या कुटुंबाची इस्लामिक मूल्ये राखणे यात अडचण जाणवत होती. तिचा स्वतःला स्वीकारण्याचा प्रवास कठीण होता. तिने एका अशा जगात प्रवास केला जिथे अनेकदा तिची श्रद्धा आणि ओळख चुकीची समजली जात असे.

हलिमाची मॉडेलिंग कारकीर्द अनपेक्षितपणे सुरू झाली. २०१६ मध्ये, जेव्हा ती १९ वर्षांची होती, तेव्हा तिला एका मैत्रिणीने मिस मिनेसोटा यूएसए स्पर्धेत प्रवेश करण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यावेळी, ती हिजाब परिधान करणारी एकमेव स्पर्धक होती. तिने हा किताब जिंकला नाही मात्र तरी ती स्पर्धेत चर्चेचा केंद्रबिंदू ठरली ते तिच्या हिजाब परिधानामुळे. त्यामुळे ती बातम्यांमध्ये आली. मॉडेलिंग उद्योगातील रूढींना आव्हान देण्याबद्दल आणि सौंदर्य मानकांची पुनर्परिभाषा करण्याबद्दल हलिमाची कथा एक सक्षम उदाहरण ठरले.



अल्पावधीत तिने प्रमुख मॉडेलिंग एजन्सींचे लक्ष वेधले. प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या आयएमजी मॉडेल्ससोबत तिने करार केला. या करारामुळे फॅशन क्षेत्रात तिच्या कारकिर्दीची सुरुवात झाली. फॅशन जगात हलिमाचे पदार्पण अभूतपूर्व होते. २०१७ मध्ये न्यूयॉर्क फॅशन वीकमध्ये सहभागी होणाऱ्या हिजाब परिधान करणाऱ्या पहिल्या मॉडेलपैकी ती एक बनली. व्होग अरेबिया, स्पोर्ट्स इलस्ट्रेटेड स्विमसूट सारख्या मासिकांच्या मुखपृष्ठांवर ती झळकली. यामुळे फॅशन जगात तिचे स्थान आणखी दृढ झाले.

हलिमाने लक्षणीय यश मिळवले असले तरी, तिचा प्रवास अडथळ्यांशिवाय नव्हता. फॅशन जगत हे पारंपरिक पाश्चात्त्य सौंदर्य मानकांवर आधारित आहे. सुरुवातीला फॅशन उद्योगातील अनेकांना हिजाब परिधान करणारी मॉडेल म्हणून ती कशी काम करते याबद्दल शंका होती. मुस्लीम समुदाय आणि मुख्य प्रवाहातील उद्योग या दोन्हींकडून हलिमाला टीकेचा सामना करावा लागला. काहींना वाटले की ती "योग्य मुस्लीम अनुयायी" नाही कारण ती देहप्रदर्शन करणाऱ्या फॅशन उद्योगामध्ये आहे, तर काहींना वाटले की उद्योगातील तिचे यश तिच्या धार्मिक मूल्यांच्या विरोधात आहे.

शिवाय, तिच्या मूल्यांचा आदर केला जाईल याची खात्री करण्यासाठी हलिमाला सतत स्वतःचे समर्थन करावे लागले. फॅशनसाठी तिने तिच्या श्रद्धेशी तडजोड करण्यास नकार दिला. तिच्या कारकिर्दीत तिने नेहमीच हिजाब परिधान के[...] आणि विनम्र स्वभाव कायम ठेवला.

आव्हानांना न जुमानता, हलिमा जगभरातील तरुण मुस्लीम महिलांसाठी ए[...] आदर्श बनली आहे. ती तिच्या व्यासपीठाच[...] वापर सामाजिक नियमांना आव्हान देण्यासाठी आणि फॅशन व माध्यमांमध्ये मुस्लीम महिलांचे अधिक समावेशक प्रतिनिधित्व करण्यासाठी करते. हलिमाचे [...] दर्शवते की एखादी व्यक्ती फॅशनेबल आणि नम्र दोन्ही असू शकते.

हलिमाने निर्वासितांचे हक्क, महिला सक्षमीकरण आणि वांशिक अन्याय यांसारख्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी हलिमाने पुढाकार घेतला आहे. ती निर्वासि[...] म्हणून तिच्या अनुभवांबद्दल आणि तिच्या सोमाली वारशावरील तिच्या अभिमानाबद्दल बोलते.

हलिमा एडनचा निर्वासित छावणीपासून आंतरराष्ट्रीय कीर्तीपर्यंतचा प्रवास हिजाब परिधान करणारी सुपर मॉडेल म्हणून तिच्[...] चिकाटी आणि प्रतिनिधित्वाच्या शक्तीचा पुरावा आहे. ती केवळ तिच्या मॉडेलिंग कारकिर्दीसाठीच नाही तर सांस्कृतिक आणि धार्मिक अडथळे दूर करण्यात तिच्[...] भूमिकेसाठी एक आदर्श बनली आहे. तिच्[...] यशाद्वारे, ती जगभरातील महिलांना त्यांची ओळख स्वीकारण्यासाठी आणि सामाजिक अपेक्षांना आव्हान देण्यासाठी प्रेरित करत आहे.

# आपल्याला भेटलेली माणसं



मोरपीस

पूजा काळे

अंतकरणातील नम्रतेने ओळखला जाणारा माणूस पाहिलाय का कोणी? चेहऱ्यावर मनाचा आरसा घेऊन फिरणारा माणूस जाणवलाय का कोणाला? माणसांच्या घोळक्यात वावरणाऱ्या माझ्या मनास आजकाल हे प्रश्न वारंवार पडतात. सिमेंट काँक्रीटच्या जंगलात स्वतःचं अस्तित्व जपणाऱ्या मनुष्य प्राण्याचे विविध रंग अनुभवता एक वेगळा रंग निर्माण होतो, ज्यावर दयेची, मायेची, सहनशीलतेची बाधित धूळ आढळते. तांडा निघावा अशा तऱ्हेने माणसं टप्प्याटप्प्याने बाहेर पडतात, आपल्याला भेटतात. काल दिसलेलं, असलेलं चित्र आज पार बदलून जातं. जसा नवा, तसा जुना असलेला आजचा विषय म्हणजे आपल्याला भेटलेली माणसं. प्रा. प्रवीण दवणे एके ठिकाणी असं म्हणतात की, आपली माणसं अचानक बटन दाबून हवी तेव्हा मिळत नसतात आणि नको तेव्हा त्यांना पेटीत बंदही करून ठेवता येत नाही. प्रसंगी सज्ज आणि दूरदृष्टीने वागत असलेल्या माणसांचा विषय तसा लाखमोलाचा म्हणावा लागेल. आपल्याला अनेक माणसं भेटतात; त्यापैकी काही नावालाचं भेटतात. नावापुरता परिचय होऊन काहींशी नुसती मैत्री होते. तर काही सच्चे होऊन अंतरंगी वसतात.

त्यावेळची एक अवस्था म्हणजे, गर्दीत पांगलेला रस्ता जुनाचं आहे, मी चालते नव्याने शोधित माणसांना माणसांची आस जगू देत नाही मला. गाव तिथं वस्ती आणि वस्ती तिथं गाव. वस्तीला शोभा आणणारी माणसाची नाव. नावेतली झुंबड अडवते मला. वळणावळणावर देते नवा दाखला. भेटलेला प्रत्येक जण मनाने, स्वभावाने, चारित्र्याने, आकृतीबंधाने वेगळा असतो. एक उंच तर एक ठेंगणा, एक विवेकी तर दुसरा उथळ, एक सूज्ञ तर दुसरा आळशी, एक बोलका तर दुसरा अबोल, एक मोकळा तर दुसरा लालची, हापापलेला. कोण गरीब तर कोण श्रीमंत, कोण चतूर तर कोण लबाड, कुणी माणुसकी पेलणारा तर कुणी अमानवी. एक खेळकर तर दुसरा गंभीर चेहऱ्याचा. यात शोभून दिसणारं उत्तम असं चारित्र्य आणि चांगुलपणा ज्याच्याजवळ सापडावा तो लाखात एक समजावा. पण अशी माणसं अभावानेचं सापडतात. वर्षानुवर्षे आवडीने, सवडीने, प्रेमाने, द्वेष घेऊन भेटलेली माणसं आपल्या छोटेखानी आयुष्याचे सहप्रवासी होतात.

व्यवहारी दुनियेतल्या कामकाजाच्या ठिकाणी, सभोवती, बसच्या गर्दीत, ट्रेनच्या धावपळीत, रस्त्या-रस्त्यावर माणसांची वर्दळ तुमचा पिच्छा सोडत नाही. सहवास, संवाद, संभाषण, वाद, व्यवसाय आणि व्यवहार यानिमित्त व्यक्ती तितक्या प्रकृती आसपास घोंघावतात.

एक व्यक्ती म्हणून याचा अभ्यास केला असता, आपल्या हाती जंजाळ सापडेल. कान, डोळे आणि बुद्धी जाग्यावर ठेवून तपास केला असता स्वयंप्रकाशी माणसं आसपास सापडतील. पण इथं शोधायला वेळ आहे कुणाला? नात्यातली गोष्ट याहून वेगळी नसते. नात्यामध्ये सुद्धा वेगवेगळ्या प्रकारची कॅरेक्टर असतात. फरक इतकाच की, ती नाती रक्ताशी जोडली गेल्याने सांभाळून घेतली जातात. अशी अनंत प्रकारची माणसं आपलं आयुष्य समृद्ध करत असतात. त्यांच्या असण्याची ताकद अनुभव संपन्नतेतून परावर्तित होते. कधी रागेरागे, कधी शिकवणुकीतून, कधी वैर धरत, कधी इर्षा करत, कधी मनस्ताप, कधी दोष दाखवत, कधी गॉसिपच्या माध्यमातून तर कधी घोर फसवणुकीद्वारे. मानसिक खच्चीकरण करत चांगुलपणावर वार केले जातात. माणसाने माणसाशी माणसासारखे वागण्याऐवजी विवेकभ्रष्ट दुर्गतीच्या मार्गाला लागणारा माणूस वाईटाचे चिंतन करतो. माणसांचे असंख्य नमुने सोबत असतात. सुखद, दुःखद आठवणींनी आपला भूतकाळ, वर्तमानकाळ व्यापून टाकण्यात यांचे योगदान पाहिलं ना की निकड या एकाचं निष्कर्षापाशी आपण येऊन थांबतो.



मग सुखद क्षणापेक्षा दुःखद आठवण देणाऱ्यांना अधिक लक्षात ठेवल जातं आणि आयुष्यभरासाठी मनस्तापाचं ओझ घेऊन जगतो आपण. मग अशी माणसं नाहक आपल्या आयुष्यात का आली? असे बरेचसे प्रश्न आपल्याला पडावे, तर ती आपल्या संपर्कात आलीचं नसती तर बरे झाले असते अशीही मानसिकता होते. या उलट काही जण आपल्या जगण्याचा भाग होतात. त्यांचं असणं, त्यांची सोबत हवीहवीशी वाटू लागताचं, दुर्दैवाने ते लांब होतात आणि चुटपूट लाऊन जाणाऱ्या मनाचे असंख्य कोपरे हळवे होऊ लागतात.

आपलं आयुष्य हे रंगमंचीय आविष्कार म्हटलं तर त्या मंचावरील नाटकातील प्रत्येक माणसाची एंट्री आणि एक्झिट कमालीची अस्वस्थ करते. निवेदन असो वा कामकाजाचे ठिकाण मला लाभलेला उत्तमोत्तम मातब्बर मंडळींचा लोकसंग्रह हा माझ्यासाठी खास आहे. लोकांकडून शिकण्यासारखं बरंच काही असताना, मी मात्र स्वतःहून शिकवणुकीचे कष्ट घेत नाही. जे काह[...] चांगलं, वाईट शिकायचं आहे, ते लोकांकडूनचं. जितकी आभूषणे अधिक तितके आपले जीवन समृद्ध हा दृष्टिकोन ठेवल्याने माझ्यातला नवा बदल सकारात्मक पद्धतीचा लोकसंग्रह निर्माण करतो. या धाटणीत अनेक प्रकारच्या स्वभावाचं[...] रंगांची माणसं मला आभूषणाप्रमाणे मिरवत[...] येतात हे विशेष. माणसं चांगली की वाईट हे वेळ[...] ठरवते. आपली वेळ चांगली असली की चांगल[...] माणसं भेटतात, जी आपल[...] साथ सोडत नाहीत. शाश्वत अ[...] लोकसंग्रहामुळे माझ्या आशावादाला घुमारे फुटतात. इतरांप्रमाणे मी ही कोणाच्या तरी आयुष्यातलं एक महत्त्वाचं आपलंस असं सुंदर माणूस वा पात्र असेनचं की! माझीही एंट्री एक्झिट असेलचं की! ती उत्त[...] निभावण्याचं काम मला करता यायला हवं जे मजबूत असेल. माझ्या एक्झिटने हुरहुर लागावी इतका लोकसंग्रह मागे ठेऊन जाताना आयुष्य प्रकाशमान होईल हे सुनिश्चित असेल.

# कोलाज

रामकथेची सुरुवात युवक श्रीरामचंद्रापासून होते. ‘अवघ्या जगाचा जो आनंद आहे तो आनंदसिंधू म्हणजे श्रीराम’. संत एकनाथ महाराज म्हणतात, रामनामामध्ये अग्नी, सूर्य, चंद्र या बीजाचे प्रतीक, सगळ्या पातकांना जाळून टाकतात. समर्थांच्या जीवनातले शेवटचे वाक्य ‘मज रघुनाथा परी ये जागी आणिक कोणी नाही.’



## कर्मयोगी श्रीरामचंद्राची कथा



प्रासंगिक
**मृणालिनी कुलकर्णी**

जय श्रीराम ! वाल्मिकी रामायण ही सर्व रामकथेचे गंगोत्री! वाल्मिकीचे खरे नाव ‘रत्नाकर.’ नारदांनी सांगितल्यानुसार प्रायश्चित्त म्हणून ‘राम, राम’ नामस्मरणांत त्यांच्या अंगाभोवती मुंग्यांचे वारूळ तयार झाले. वारुळाला संस्कृतमध्ये वल्मीक म्हणतात त्यातून वाल्मिकी !

“श्रीरामकथामृत” हे स्वामी गोविंद देव या पुस्तकाच्या आधारे मी ‘कर्मयोगी श्रीरामचंद्राची कथा’ हा लेख लिहिला आहे. वाल्मिकींच्या रामकथेची सुरुवात युवक श्रीरामचंद्रापासून होते. आधीपासून श्रीराम मनुष्यरूपात वावरले. मनुष्याच्या सगळ्या उणिवा, मर्यादा स्वीकारून मानवी मर्यादेच्या अंतर्गतच आपल्या सगळ्या लीला अभिव्यक्त केल्या. उदा. १ पतितांचा उद्धार करताना शिळा होऊन पडलेल्या अहिल्येला श्रीरामाच्या चरण स्पर्शाने नारी रूप प्राप्त झाले. २ सेतू बंधनात एका दगडावर ‘रा’ आणि दुसऱ्या दगडावर ‘म’ लिहिलेले दगड वानरांनी पाण्यांत टाकताच चिकटले. श्री रामांचा स्वतःवर पूर्ण ताबा होता. अंगी संयमही होता. पूर्ण आयुष्यांत श्रीरामाने मर्यादेचे पालन केले म्हणून त्यांना ‘मर्यादा पुरुषोत्तम’ म्हणतात.

चैत्र नवमी रविवार, दुपारी १२ वाजता जन्माला आलेल्या कौसल्या नंदनाचे नाव महर्षी वसिष्ठांनी ‘राम’ ठेवले. ‘अवघ्या जगाचा जो आनंद आहे तो आनंदसिंधू म्हणजे श्रीराम’. संत एकनाथ महाराज म्हणतात, रामनामामध्ये अग्नी, सूर्य, चंद्र या बीजाचे प्रतीक, सगळ्या पातकांना जाळून टाकतात. “चरितं रघुनाथस्य ... महापातकनाशम्”! रामनामात अपार सामर्थ्य आहे. भक्तीने मनुष्याचे जीवन बदलते हे रामकथेत पाहतो. समर्थांनी प्रभू रामचंद्राखेरीज कुणाची स्तुती केली नाही. समर्थांच्या जीवनातले शेवटचे वाक्य “मज रघुनाथा परी ये जागी आणिक कोणी नाही.” शिवछत्रपतींचे आदर्श भगवान श्रीरामचंद्रच होते. रामनामांत एक सुरक्षिततेची भावना येते.

गोस्वामी तुलसीदासांच्या रामकथेत मानसरोवराचे चारही घाटावर रामकथा चालू आहे. पहिला घाट - ज्ञानाचा, दुसरा घाट - कर्माचा, तिसरा घाट - भक्तीचा, चौथा घाट - प्रपात्तीचा (म्हणजे पापाचे शालन करावे, जीवन बदलणे) वक्ते स्वतः संत गोस्वामी तुलसीदास आणि श्रोते सामान्य मनुष्य)

वसिष्ठ मुनींच्या आश्रमातून चारही भाऊ समान शिक्षण घेऊन बाहेर पडले; परंतु त्या दिवसांत श्रीराम चिंतामग्न होते. उत्तम वस्त्रे, मिष्टान्न, अलंकार सारे त्यांना नकोसे वाटत होते. ते खाली झोपत. याच सुमारास विश्वामित्रांनी दुष्टांच्या संहाराकरिता राजा दशरथाकडे रामाची मागणी केली. “राजा ! सगळ्या दुष्टांचे मूळ लंकेतला रावण आहे. रावांचे हस्तक संपूर्ण जगात पसरलेले आहेत. या सगळ्यांचा आरंभ रामापासून करावयाचा आहे. जरी रावणाने सीतेला पळविले नसते तरी रावणाचा वध रामाकडून होणार आहे ते श्रीरामचंद्राच्या आयुष्याचे ध्येय आहे. विश्वामित्रांना श्रीरामाला अयोध्येचा भावी राजा घडविण्यासाठी राजमहालाबाहेर काढले. चाण्यक्यानेही तरुणपणीच चंद्रगुप्ताला बाहेर काढले होते.

विश्वामित्रांनी पूर्वजांच्या कथा, मार्गातील प्रदेशांची माहिती सांगत, स्वतःकडील दिव्यास्त्रांचे ज्ञान देत, वाटेतील गावकऱ्यांशी भेटी करून देत त्यांचे तसेच समाजाचे प्रश्न, झाडे-पशू-पक्षी सगळ्यांची माहिती देत होते. दिवसभर पायी चालायचे, रात्री झाडाखाली झोपायचे.

“ज्याच्यामुळे धर्माचा उच्छाद होतो, माझ्या जनतेला त्रास होतो, मग तो कुणीही असो, मी त्याचा वध करीन” असे सांगून १६ व्या वर्षी श्रीरामाने पहिला त्राटिका वध केला. सुबाहू, मारीच अशा अनेक राक्षसांना श्रीरामाने ठार केले. अयोध्या ते मिथिला या प्रवासात महर्षी विश्वामित्रांनी रामाचे संपूर्ण जीवन घडविले. या संस्कारांमुळेच पुढचा वनवास श्रीरामांना सहन करता आला. मिथिला नगरीत राम - सीता लग्न ! नांगराच्या फळीचे टोक म्हणजे सीत. भूमीत अडकून मिळाली म्हणून सीता ! जनकाची मानस कन्या मिथिला, वैदेही...

“पुत्र वियोगाने तू मरशील” हा राजा दशरथाला दिलेला अंध श्रावणाच्या मातापित्याने दिलेला शाप खरा ठरला. कैकयीच्या वरामुळे रामाला वल्कले नेसून १४ वर्षे वनवास ! ‘जेथे राघव तेथे सीता’, ‘ज्या ठिकाणी प्रभूचे चरण तेथे माझा निवास’ असे म्हणत सीता रामासोबत निघाली. रामभक्तीचा पुतळा लक्ष्मण, लक्ष्मणाने रामाखेरीज अन्य कशाचेही चिंतन केले नाही. रामाबरोबर वनवासाला निघताना श्रीरामाने लक्ष्मणाला मातेची अनुमती घेण्यास सांगताच लक्ष्मण म्हणाला, ‘माता रामो... रामचंद्र’ तूच माझी माता आणि तूच माझा पिता.” श्रीरामाला कोणी त्रास, दुःख दिले की लगेच लक्ष्मण तापत होता. श्रीरामानेही माता, पिता, भाऊ, पत्नी या साऱ्यांचा वियोग सहन केला पण रामायणाच्या शेवटच्या भागांत राजधर्म म्हणून लक्ष्मणाला प्राणदंड शिक्षा सुनावल्यानंतर स्वतः रामचंद्र महर्षी वसिष्ठांना प्रणाम करून म्हणाले, “माझ्याशिवाय लक्ष्मण आणि लक्ष्मण शिवाय मी कधीच राहू शकत नाही. लक्ष्मणा पाठोपाठ श्रीरामानेही शरयू नदीत प्रवेश केला. जगाचा आधार श्रीराम पण श्रीरामाचा आधार लक्ष्मण होता.

भरताचे रामप्रेम हा रामकथेचे आत्मा आहे. भरताला माझ्यासाठी रामाला वनवासात जावे लागले ही खंत होती. भरताचे अंतःकरण रामावरच्या प्रेमाने ओथंबलेले होते. श्रीरामांना अयोध्येत परत बोलावितांना वनवासात गेलेल्या भरताला श्रीराम म्हणाले ‘माझ्या पित्याला संकटातून सोडविण्यासाठी हे व्रत मी घेतले.’ भरताने स्वामी म्हणून नव्हे तर सेवक म्हणून व्रतस्थ जीवन आचरत नंदीग्रामात श्रीरामांच्या पादुकांची सेवा केली. भक्तीचा परमोच्च आदर्श ! भरताची पत्नी मांडवी, लक्ष्मणची उर्मिला आणि तिन्ही माता अयोध्येत!

रामकथेच्या मंदिरात प्रवेश करताना, ज्याचा उल्लेखही रामकथेत नाही अशा शत्रुघ्नाला पहिला प्रणाम करणे आवश्यक आहे. संपूर्ण राज्य, सेना, घरातील महिला साऱ्यांना सांभाळले पण एकदाही सिंहासनावर बसण्याचा क्षुद्र विचारही मनात आला नाही. सुमंत्राच्या रथातून वनवासाला निघाल्यानंतर तमसा नदी, नंतर चालत गंगातीर, चित्रकूट येथे राम भरत भेट झाली होती. महर्षी वशिष्ठ ही तेथेच भेटले.

रामकथेत प्रत्येकाने आपल्या जीवनांत अधिकारांना तिलांजली दिली. सर्वांनी आपल्या कर्तव्याचे पालन केले. सर्वांच्या अंतःकरणातील रामप्रेमामुळे त्यांच्याकडून विलास आपोआप सोडून दिले गेले. श्रीराम धर्मज्ञ आणि कृतज्ञ होते. श्रीरामांनी धर्माचा, सद्गुणांचा कधीच त्याग केला नाही. तसेच आपले कोंदड शस्त्र आपल्या जवळ ठेवले. कारण ते जाणून होते, केवळ सज्जनाने सारे प्रश्न सुटत नाहीत.

श्रीराम सतवाक्य होते. (सत्य कधी लपवले नाही. चुकीचे/खोटे कधी बोलले नाही. श्रीराम अष्टवक्र मुनीला म्हणाले होते, “गुरुदेव ! माझ्या जीवनांत सर्वाधिक महत्त्व माझ्या प्रजेला आहे. प्रजेची सेवा करताना मी माझ्या वैयक्तिक सुखाचा अथवा प्रेमाचाही विचार करणार नाही.” (पत्नी सीतेचा त्याग) दहा वर्षांच्या वनवासांत भिन्न भिन्न ऋषींच्या आश्रमांत राहिले, चर्चा केली. वनवासी लोक, भिल्ल, वानर (वाली सुग्रीव), राक्षस, शबरी, बिभीषणासह त्याचे मंत्री सर्वांना श्रीरामाने जोडून घेतले. विशेष म्हणजे जगातला सर्वात लहान मानला जाणारा भिल्लांचा राजा निषाद गृह आणि सर्वोच्च महापुरुष महर्षी वसिष्ठ यांची गळाभेट झाली. काहीकाळ आपसात वैर आलेले वसिष्ठांनी आणि विश्वामित्र ऋषी ही नव्हे सारेच श्रीरामाच्या प्रेमाने जोडले गेले होते. मायावी सुवर्णमृगाचे रूप घेऊन आलेल्या राक्षसाला लक्ष्मणाने ओळखले. तरीही सीतेकडून लक्ष्मण रेषा ओलांडली गेली. सुग्रीव वाली कथानकांत वालीने आपला पुत्र अंगदला श्रीरामाच्या हवाली करतो.

हनुमान - केसरी नामक वानराला वायुदेवाच्या कृपेने झालेला पुत्र हनुमान ! सद्गुणांचा अर्क, अतिशय विद्वान,(चारी वेदांचं ज्ञाता) (बुद्धिमतां वरिष्ठम्). वेषांतर करू शकणारा, ‘सकल गुण निधान’ हनुमान ! श्रीराम-हनुमान पहिली भेट- ऋष्यमूक पर्वताच्या पायथ्याशी घडली. स्वयं हनुमान ब्राह्मण बटूच्या वेशात समोर आल्यानंतर राम लक्ष्मणाने बटूला नमस्कार केला.

जटायूचा भाऊ संपाती ! हे गृध जातीचे. संपातीने एका पर्वताच्या शिखरावर एके ठिकाणी दृष्टी स्थिर केली आणि म्हणाले, एका वाटिकेत वृक्षाखाली भगवती जानकी बसली आहे. जानकी जिवंत आहे हे संपातीमुळे प्रथम कळाले. मग हा मोठा सागर पार कोण करणार? वानरांचे भगवान जांबावताने हनुमानाला सांगितले, ऊठ हनुमंता, हे काम तुझे आहे. ‘सियावर रामचंद्र की जय’! पुढे हनुमानाने लंका दहनाने रावणाला अस्वस्थ केले. हनुमंताच्या बोलण्यांत, कृतीत श्रीरामाविषयी प्रेम, दास्यभाव भक्ती पदोपदी जाणवते. रामकथेत हनुमानाला कोणतेही पद नाही पण त्याच्याशिवाय कोणतेही काम होत नसे. रावणाला युद्धासाठी उतेजित करण्यासाठी शूर्पणखेला ठार न मारता तिचे कान, नाक कापून टाकले. युद्ध होऊ नये याकरिता शेवटपर्यंत श्रीरामाने प्रयत्न केले. युद्ध अटळ झाल्यावर तितक्याच उत्साहाने रणांगणात उतरले. युद्धात अनेक गोष्टी घडल्या. ८७व्या दिवशी रामाने रावणाचा वध केला. रावणाला ठार मारले पण रावणाच्या देहाची विटंबना होऊ दिली नाही. मनुष्य मरण पावला, वैर संपले. सर्व देवांनी स्तुती करताच, श्रीराम म्हणाले, ‘मला देव बनवू नका. मी दशरथपुत्र आहे. बिभीषणाकडे लंका सोपवून श्रीराम १४ वर्षांनी मातृभूमी अयोध्येकडे परतले. ही रामकथा भागवतधर्माच्या हजारो वर्षे आधी जन्माला आली. तेच प्रसंग, तीच पात्रे, तोच राम -तोच रावण, तीच अयोध्या, तीच लंका, तरीही कर्मयोग्याचे सर्वोत्तम जीवन जगणाऱ्या प्रभू श्रीरामचंद्राचे चरित्र आजही चिंतन करावे, पुन्हा पुन्हा पुन्हा वाचावे, ऐकावे असे वाटते. कारण ही रामकथा एका आदर्शवादी मनुष्याची कथा आहे. जीवनांत कसे वागावे यासाठी ती अनुकरणीय आहे. जय श्रीराम !

mbk1801@gmail.com

## प्रसाद...



एका छोट्याशा गावात गेलो होतो. निवृत्त शिक्षकाचा सत्कार होता. ग्रामस्थांनी छान तयारी केली होती. चहापाणी झाले. हाती थोडा वेळ होता. लोक जमू लागले होते. गावातला तरुण म्हणाला, “थोडा वेळ आहे. भैरीच्या देवळात जाऊन येऊ ! माझ्यासोबत आलेल्या मित्राला देवळात जाण्याची गोष्ट फारशी आवडली नाही. त्याच्या चेहऱ्यावर दिसतच होते. मी निघालो तसा तोही निघाला. देऊळ म्हणजे खोपटेच होते. “फार जागृत स्थान आहे, सर ! सगळे गाव मानते. गावातला तरुण म्हणाला. माझा मित्र कसनुसा हसला.

देवळात गेलो. मी नमस्कार केला. गुरवाने प्रसाद दिला. मी पाया पडून प्रसाद तोंडात टाकला. मित्राच्या हातात प्रसाद तसाच होता. त्याने पहिल्यांदा वास घेतला. मग निरखून पाहिले. न खाता त्याने प्रसाद हळूच एका दिवळीत ठेवला. मी प्रदक्षिणा घातली. गुरव म्हणाला, “बरं केलं तुम्ही सत्काराला आला ते! गुरुजी फार भला माणूस. सगळं गाव शानं केलं. कुठं अडू द्या-नडू द्या; देवासारखं गुरुजी पळत येणार. पण नशिबानं त्यांना न्याय दिला नाही ! गुरवाच्या या वाक्याने मी कान टवकारले. गुरुजींचे जीवन समजून घेण्यासाठी गुरवाला एक-दोन प्रश्न विचारले. गुरुजींची जीवन कथा ऐकून मी स्तब्ध झालो. तरुण मुलगा अकाली गेला. लग्न झालेल्या मुलीचा संसार मोडला. मुलगी माहेरी आली. बायकोला दोन्ही धक्क्यांनी वेड लागले. तिला सावरून, उभी करून गाडी रुळावर येत होती तेव्हाच मुलीने जीव दिला. एकमेकांच्या आधाराने ते दोघे उभे राहिले. सारे गावच कुटुंब बनवले. गुरुजींनी केलेले कार्य मला माहीत होते, पण ही सारी दुःखभरली कहाणी माहीत नव्हती.

**विवेक घळसासी, (निरूपणकार)**

कार्यक्रम छान झाला. निघताना मी आणि माझा मित्र गुरुजींचा निरोप घ्यायला मुद्दाम गेलो. मी निघताना गुरुजींना न राहवून विचारले, “हे सगळे कसे सहन केलेत?’’ गुरुजी म्हणाले, “आयुष्यात जे आपल्याला मिळते तो देवाचा प्रसाद मानला. चिकित्सा नाही. चिरफाड नाही. चिडचिड नाही. प्रसाद हातात आला की चटकन तोंडात टाकतो की, नाही आपण? चवीचा विचार नाही करत. ताजे-शिळे म्हणत नाही. त्याला पेढा, मला गूळ का? म्हणत नाही. घेतो. खातो. धन्य होतो. हे कधी विसरलो नाही. प्रसाद देवाचा प्रतिसादच मानला !’ माझे डोळे भरून आले. मी वाकून नमस्कार केला. छान हसून माझा हात हातात घेतला. स्पर्श आणि हास्याचा जणू मला त्यांनी प्रसादच दिला!

गुरुजींशी झालेल्या संवादातून केवढा हितोपदेश मिळाला; तोही सहजच! प्रसाद देवाचा प्रतिसाद असतो हे पटले तर जगणे किती सुंदर बनून जाते हे मला समजले.

मंदिरात आपल्याला प्रसाद मिळतो त्याची आपण चिकित्सा राहोच, चर्चाही करत नाह कुणाला चार शेंगदाणेच मिळतील तर कुण बत्तासा! कुणाला काजूचा तुकडा असलेला शिरा मिळेल तर कुणाला करपलेल्या शिऱ्य लाभ होईल! आपण प्रसाद घेतो, खातो आणि कृतकृत्यतेने हात जोडतो. देवळातल प्रसादासारखेच मानावेत आयुष्यातील प्रसंग जे वाट्याला आले ते आपल्या इष्टाचा प्रति मानले की सारी घालमेलच संपते. गुरुजींश झालेल्या मुक्त संवादाने मी आतून उजळून निघालो.

एकदा माझी नाशिकला भागवत कथा झाली. सांगता झाली तेव्हा सर्वांना प्रसादही दिला. सारी आवराआवर झाल्यावर एक वृ आली. म्हणाली, “प्रसाद कधी मिळेल?’’ जिकडचे तिकडे झाल्याचे तिला कळल्याव ती खट्टू झाली. तेवढ्यात त्या कार्यालयात असणारी एक महिला म्हणाली, “थांब मावशी. एक लाडू आहे. देते तुला !’’ वृद्धे आनंद झाला. बुंदीचा लाडू हातात घेऊन तिने कपाळाला लावला आणि लाडवाचा एक तुकडा घेऊन उरलेला लाडू परत देत म्हणाली, ‘‘पुन्हा कुणी आलं तर यातला कणभर त्यालाही देता येईल. कुणी तसंच जायला नगं ! परसाद जीव निवण्यासाठी पायजे... पोट भरण्यासाठी नाय् !’’

मला तिचे पाय धरावे वाटले. आध्यात्मिकतेने अनासक्ती येते ती अशी ! प्रसन्न असेल ना; तर मनाने नाही, कणानेही समाधान लाभते हे त्या वृद्धेच्या संवादातून उलगडले.

परमार्थ वेगळे काय शिकवतो? आयुष्यातला प्रत्येव क्षण भगवंताचा प्रसाद म्हणून स्वीकारता आला तर सारे तणाव, सारा वैताग संपून जाई जगणे ‘प्रासादि’क होईल. बीजात सारा वृक्ष सामावलेला असतो, तसा कणाकणांत ब्रह्मांडव्यापी आनंद कोंदटलेला असतो. पण आपल्या हव्यासापोटी आपण ब्रह्मांडच खिशात घालायचे म्हणतो. मग हट्ट सुरू हो आणखी मिळवेन, खूप मिळवेन, जास्तीत जास्त मिळवेन शेवटी ओंजळ रिक्तच राह असे निराश होण्यासाठी आपल्याला आयुष्य मिळालेले नाही.

खरे तर आयुष्य हाच महाप्रसाद आहे. एकदा ते मिळाले म्हणताना, आणखी काय हवे? आता मिळवायला नव्हे तर वाटायल शिकले पाहिजे. तळहातावर मिळालेला गोपाळकाला, स्वतःसाठी थोडा ठेवून कण सर्वांना वाटायचा असतो!

देता यायला लागले की, आपणही कृष्ण होतो. परमार्थ म्हणजे जवळचे उत्तम सर्वांन देणे. थोड्यातलाही आनंद घेणे. आपले अः रोखून हसण्याचे चांदणे पसरणे. बस्स, हव आणि हट्ट सोडण्याची तयारी करायला पाहि

## ‘विंदा’ करंदीकर



कोकण आयकॉन
**सतीश पाटणकर**



‘विंदा’ करंदीकर यांचे पूर्ण नाव गोविंद विनायक करंदीकर. त्यांचा जन्म २३ ऑगस्ट १९१८ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील घालवली या गावी झाला. विंदा हे कोकणातील पोम्भुर्ल्याचे. तिकडचा टिपीकल कोकणी स्वभाव नि वृत्ती विंदांमध्येही उतरली होती. पण विंदा कोकणपट्टीतच अडकले नाहीत, ते वैश्विक झाले. त्यांच्या जगण्याचे भानही कायम वैश्विक राहिले. पण कोकण नि त्याची दरिद्री अवस्था हा त्यांच्या कायम चिंतेचा नि चिंतनाचा विषय राहिला. उच्च शिक्षण कोल्हापूरमध्ये झाल्यानंतर ते शिक्षण क्षेत्रात आले. बसवेश्वर कॉलेज, रत्नागिरी, रामनारायण रुईया महाविद्यालय, मुंबई, एस.आय.ई.एस. कॉलेज इत्यादी महाविद्यालयांमध्ये ते इंग्रजी विषयाचे प्राध्यापक होते. त्या आधी ते हैदराबाद मुक्तीसंग्रामातही सहभागी झाले होते.

विदांनी बालकविता, विरूपिका, छंदोबद्ध काव्य, मुक्तछंद आणि लघुनिबंध असे महत्त्वाचे साहित्यप्रकार लीलया हाताळले. या सगळ्यांत विविध प्रयोग केले. मा. विंदांनी ‘स्वेदगंगा, मृदगंध, धृपद, जातक, विरूपिका, संहिता’ असे कवितासंग्रह तर ‘राणीचा बाग, परी गं परी, सर्कसवाला’ यांसारखे बालकवितासंग्रह दिले. १९४९ साली प्रथम प्रकाशित झालेल्या ‘स्वेदगंगा’पासून मा. विंदांचा साहित्यिक प्रवास सुरू झाला. विंदांचे पहिले काव्यवाचन आचार्य भागवत यांच्याकडे झाले. १९४९ साली पुण्यात भरलेल्या मराठी साहित्य संमेलनातील पहिल्या जाहीर काव्यवाचनाने त्यांचा मराठी भाषकांस परिचय झाला. मराठीतील महत्त्वाचे समीक्षक म्हणूनही त्यांना मान्यता मिळाली होती. लघुनिबंधकार म्हणूनही ते प्रसिद्ध होते. गझल, गीत, मुक्तसुनीत, तालचित्रे, विरूपिका असे जुने काव्यप्रकारही त्यांनी हाताळले.

विंदांच्या बालकविता हा त्यांचा एक वेगळाच पैलू आहे. एकदा काय झाले सशाचे कान, एटू लोकांचा देश, परी गं परी, अजबखाना, सर्कसवाला, पिशीमावशी आणि तिची भुतावळ, अडम् तडम्, टॉप, सात एके सात, बागुलबोवा. हे त्यांचे बाल काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. या बालकविता अत्यंत वेगळ्या अशा आहेत. नावीन्यपूर्ण कल्पना आणि विनोदाची छानशी फोडणी ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. स्पर्शाची पालवी व आकाशाचा अर्थ हे त्यांचे लघुनिबंधसंग्रह, ज्ञानेश्वरांच्या अमृतानुवाचे अर्वाचिनीकरण हा त्यांचा अभिनव प्रयोग होता. स्वतःच्याच काही कवितांचा त्यांनी इंग्रजीतही अनुवाद केला होता. पण विंदा आठवतात ते त्यांनी महाराष्ट्रभर केलेल्या काव्यवाचनामुळे. दर्जेदार मराठी कवितांना घरे मिळवून देण्याचा हा अफाट यशस्वी प्रयोग होता. काव्यवाचनाचा प्रकार फारसा रूढ. वसंत बापट, मंगेश पाडगावकर आणि विंदा या तिघांनी काव्यवाचनाच्या जाहीर अनेक कार्यक्रम केले होते. विंदा करंदीकर यांना साहित्य क्षेत्रातला सर्वोच्च प्रतिष्ठेचा एकोणचाळिसावा ज्ञानपीठ पुरस्कार त्यांना ’अष्टदर्शने’ या साहित्यकृतीसाठी प्रदान केला गेला. वि. स. खांडेकर आणि कुसुमाग्रजांनंतर हा पुरस्कार मिळवणारे ते तिसरे मराठी साहित्यिक ठरले. मा. विंदांना सर्वोच्च पातळीवरील राष्ट्रीय कवी म्हणून ‘कबीर पुरस्कार’आणि ‘कालिदास पुरस्कार’ हे मानाचे पुरस्कार प्राप्त झाले होते. याशिवाय विंदांना महाराष्ट्र साहित्य परिषद पुरस्कार, कुसुमाग्रज पुरस्कार, जनस्थान पुरस्कार सारखे अनेक सन्मान व पुरस्कार प्राप्त झाले होते. मार्क्स आणि गांधीवादावर अढळ निष्ठा असणाऱ्या विंदांनी पुरस्कारापोटी मिळालेले लक्षावधी रुपये सामाजिक संस्थांना देऊन ‘देणाऱ्याने देत जावे’चा अनुभव रसिकांना दिला.

काव्यवाचनाचा प्रकार फारसा रूढ नसतानाही काव्यवाचनाच्या जाहीर कार्यक्रमांचे अनेक फड रंगवले आहेत. १९४९ साली प्रथम प्रकाशित झालेल्या ‘स्वेदगंगा’पासून सुरू झालेला विंदांचा साहित्यिक प्रवास ‘मृद्गंध’, ‘धृपद’, ‘जातक’, ‘विरूपिका’ आदी काव्यसंग्रह; ‘स्पर्शाची पालवी’ आणि ‘आकाशाचा अर्थ’ हे दोन लघुनिबंधसंग्रह; ज्ञानेश्वरांच्या ‘अमृतानुभवा’चा अर्वाचीनीकरणाचा अभिनव प्रयोग; ‘परंपरा आणि नवता’ हा मराठी समीक्षालेख संग्रह; फाऊस्ट, राजा लिअर आणि ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र आदी अनुवादीत ग्रंथ.‘राणीचा बाग’, ‘अष्टदर्शने’ या संग्रहापर्यंत येऊन पोहोचतो. ‘अष्टदर्शने’ या संग्रहात आठ तत्त्वज्ञांचे विचार त्यांनी सोप्या रचनांमध्ये मांडले आहेत. याच संग्रहाकरिता त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला आहे. आशयगर्भित पण सोपी शब्दरचना करणारे विंदा आपल्या कवितांतून वैश्विक सत्य धुंडाळत राहिले. त्यांची कविता प्रयोगशील आहे. विंदांच्या काव्यात व्यक्तिगत भावजीवनापासून सामाजिक वास्तवापर्यंतचे व्यापक अनुभव पाहायला मिळतात. विंदांना ललित पारितोषिक समितीचे क्रिटिक्स ॲवॉर्ड, सीनियर फुलब्राईट, कबीर सन्मान, सोव्हिएत लँड नेहरू लिटररी ॲवॉर्ड, जनस्थान पुरस्कार तसेच साहित्य अकादमीची फेलोशिपही मिळाली आहे.

१९४९ च्या मे महिन्यात विंदांच्या ‘स्वेदगंगा’ या कवितासंग्रहाची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली. ‘स्वेदगंगा’ या कवितासंग्रहात अंतर्भूत कवितांची सामाजिक आशयाची कविता, व्यक्तिचित्रणात्मक, प्रेमविषयक, बालजीवनविषयक, चिंतनात्मक, देवगड-राजापूरकडील बोलीभाषेतील कविता अशी वर्गवारी करता येऊ शकते. स्वेदगंगा कवितासंग्रहातून पुढील तीन कविता घेण्यात आल्या आहेत. विंदांच्या एकूण कवितेबद्दल बोलायचं तर ती बहुरूपिणी आहे.

तिच्यात ‘माझ्या मना बन दगड’ किंवा ‘जिचा आत्मा एक ती जनता अमर आहे’ असं सांगण्याचं सामर्थ्य आहे. ‘परीचा पडला दगडावर पाय, दगड म्हणाला आय आय’ किंवा ‘माझे मला आठवले तुझे तुला आठवले, नकळत हातामध्ये हात गेले गाठवले, सावरला पुन्हा तोल जरी कळे दोघांनाही जुने पाणी किती खोल’सारखी सुकोमलता आ ‘उपजत होती तुला कला ती’ किंवा ‘सारे तिचे होते सारे तिच्याचसाठी हे चंद्र-सूर्य तारे सारे तिच्याच पाठी, जेव्हा प्रदक्षिणा ती घाली मारुत तेव्हा पाहायची हो मूर्ती वळून पाठी’सारखा अवखळपणा आहे. ‘तेच ते’ किंवा ‘उपयोग काय त्याचा’ या कवितेत हसता हसता तत्त्वज्ञा सांगणारा मिश्कीलपणा आहे.

‘असा मी तसा मी कसा मी कळेना स्वतः घरी दूरचा पाहुणा मी’ किंवा ‘तसेच घुमते शुभ्र कबुतर’सारखी प्रगाढ वैचारिकता आहे. ‘देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे, घेत घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावेत’सारख सखोल संस्कार आहे. आशयाच्या आणि अनुभवाच्या अंगाने ती जाणीव समृद्ध आणि भाव समृद्ध आहेच, पण तिच्या घाटांचा किंवा आकृतीबंधांचा विचार केला तर त्याही बाबती तिच्यात नैसर्गिक लवचिकता आणि विविधता आहे. म्हणजे असे की त्यांनी लयबद्ध आणि छंदवृत्तातल्या कविता जशा लिहिल्या, तशा स्वच्छंदी, तालबद्धा गद्य किंवा मुक्तसुनीते, मुक्तछंद, अभंग अशाही रचना केल्या. गझले फॉर्मही त्यांनी समर्थपणे हाताळला. विंदाचे वैयक्तिक जीवन साधे, स्वावलंबी राहिले. त्यांनी स्वातंत्र्य-सैनिकांना मिळणारे वेतनपण कधी स्वीकारले नाही. काटेकोरपणाबद्दल त्यां भूमिका नेहमी आग्रही राहिली. देता देता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावेत, इतके देऊन टाकत हा कवी आपल्यातून निघून गेला. मा.‘विंदा’ करंदीकर यांचे १४ मार्च २०१० रोजी निधन झाले.

# भाईचारे की जिंदा मिसाल है पप्पू कागदे साहब!

ऋणानुबंध

## बीडमध्ये रिपाइंचा चौदा वर्षांपासून ईद ए-मिलाप





पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:हिंदू-मुस्लिमांच्या ऐक्याचे प्रतिक असलेल्या पवित्र रमजान ईदचे औचित्य साधून हिंदू-मुस्लिम भाईचारा वाढविण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हिंदू-मुस्लिम समाज बांधवांना ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी व सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी बीड शहर रिपाइंच्या वतीने बशीरगंज चौक बीड येथे रविवार (दि.६) एप्रिल २०२५ रोजी हजारो हिंदू-मुस्लिम बांधवांच्या उपस्थितीत ईद ए-मिलाफ कार्यक्रम संपन्न झाला. भारताची एकात्मता व देशातील सर्व धर्मीय भाईचारा व बंधुता टिकून ठेवण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य व बंधुताचा संदेश देत भारत एक संघ ठेवण्याचे महान कार्य केले. सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी व हिंदू-मुस्लिम भाईचारा वाढविण्यासाठी गेल्या चौदा वर्षापासून रिपाइंच्या वतीने केले जात आहे. आगामी काळातही समता, स्वातंत्र्य,बंधुता व एकोपा जोपासण्यासाठी सर्व धर्मीयांना सोबत घेऊन ईद ए-मिलाफच्या माध्यमातून सुरू राहणार आहे. रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी आयोजित केलेल्या ईद-ए-मिलाफच्या कार्यक्रमास

माजी आ.राजेंद्र जगतप, जनार्धन तुपे,

मोईन मास्तर, सय्यद सलीम,आ. विजयसिंह पंडित, डॉ.योगेश क्षीरसागर, सुशीलाताई मोराळे, तय्यबभाई, जावेद कुरेशी, फारूक पटेल, ऍड.बाळासाहेब राख, उल्हास गिराम, बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके, पोलीस उपविभागीय अधिकारी विश्वंभर गोल्डे, अशोक लोढा, अमृत सारडा, नवनाथ शिराळे, शेख शफिक भाऊ, चंद्रकांत नवले, अशोक हिंगे, रंजित क्षीरसागर, शेख इकबाल, जलील पठाण,ड.सय्यद यासेर पटेल,बबन वडमारे, गोपाळ धांडे, विष्णू वाघमारे, सुहास पाटील, डॉ.सतिष साळुंके, डॉ.लक्ष्मण जाधव, ड.सुभाष राऊत, सुनिल क्षीरसागर, वैभव स्वामी, दिनेश लिंबेकर, जयतुला खान, सादेक जमा, गणेश वाघमारे,किशोर कांडेकर, अविनाश जावळे, अशोक साळवे, अरुण निकाळजे, सादेक कुरेशी, लक्ष्मण सिरसट, धोंडीराम सिरसट,दीपक कांबळे, दशरथ सोनवणे, प्रमोद दासूद, गौतम बचुटे, संदीपान डोंगरे, बापू पवार, शाहू डोळस, » पान २ वर

# कापरेवाडीत रस्त्याची लावली वाट!

सवाल:सीईओ साहेब खड्डे तुम्ही निट करणार का गुत्तेदार ?



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: तालुक्यातील जलजिवन कामात अंदाजे लाखो, करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करुन गावातील सिमेंट रस्ते खोदून गुत्तेदार निधी उचलून शेंगा हानणत आहे सीईओ आदित्य जिवणे साहेब अशा गुत्तेदारांना पाठीशी घालणार का तुम्ही पन त्यांच्या यादीत जानार व अर्धवट बोगस कामे करणाऱ्या गुत्तेदाराचा मनमानी कारभार सुरू ठेवणार असा प्रश्न नागरिकांना पडला आहे कारण अगोदरच गाव छोटे आहे व त्यांमध्ये गावातील गल्ली बोळात जलजिवनच्या कामात रोड खोदले आहेत त्यामुळे गावातुन साधी मोटरसायकल सुध्दा चालवायची समस्या गंभीर झाली आहे तसेच लाखो रूपयांची योजना कापरेवाडीसाठी जलजिवन योजने अंतर्गत मंजूर करण्यात आली आहे परंतु गावांमध्ये नागरिकांना पाणी पिण्यासाठी सुध्दा नाही त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत तसेच गावांमध्ये संपूर्ण रोड खोदुन गुत्तेदार मोकळा झाला आहे तरी सीईओ साहेब गुत्तेदारावर कार्यवाही करणार का तुम्ही खोदलेले रोड व्यवस्थित करणार असा प्रश्न नागरिकांना पडला आहे नागरिकांन मध्ये चर्चा सत्र सुरू झाले आहे .

# शालेय बस झाडावर आदळली

दुर्घटना:बसचालकासह चार विद्यार्थी किरकोळ जखमी



पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:विद्यार्थी शाळला घेऊन जाणारी मिनी स्कूल बस झाडाला धडकल्याची घटना आज आष्टी परिसरात घडली. येथील अहिल्यानगर बीड रस्त्यावरील बेलगाव चौकात हा अपघात झाला.आष्टी तालुक्यातील वटणवाडी येथून शाळेला विद्यार्थी घेऊन मिनी स्कूल बस आष्टीकडे जात होती. सकाळच्या सत्रातील शाळा असल्याने चालक मुलाला घेऊन चालला होता. दरम्यान

अचानक समोरुन आलेल्या कारला वाचविण्याच्या प्रयत्नात » पान २ वर

# परळीत भाजपाचा स्थापना दिन

पंकजा मुंडे: कार्यकर्त्यांकडून आनंदोत्सव

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:भारतीय जनता पार्टीचा स्थापना दिवस शहरात आज उत्साहात साजरा करण्यात आला. राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी झेंडावंदन करून तसेच फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला.

६ एप्रिल भाजपाचा आजचा स्थापना दिवस ना. पंकजाताई मुंडे यांच्या अरुणोदय मार्केटमधील संपर्क कार्यालयात अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. स्थापना दिनानिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष सतीश मुंडे, शहराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया यांच्या हस्ते भाजपच्या ध्वजाचे झेंडावंदन करण्यात आले. तत्पूर्वी ज्येष्ठ नेते शामाप्रसाद मुखर्जी, दीनदयाळ उपाध्याय, अटलबिहारी वाजपेयी, लोकनेते गोपीनाथराव मुंडे, प्रमोद महाजन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी फटाके फोडून व पेढे वाटून एकमेकांना » पान २ वर



### आरोग्य शिबीराला भेट

भाजपच्या स्थापना दिनानिमित्त मुंबईतील माहीम विधानसभा मतदारसंघात आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबीराला ना. पंकजाताई मुंडे यांनी भेट देऊन याठिकाणी उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांशी संवाद साधला. तसेच महिला उद्योजिकांकरिता लावण्यात आलेल्या विनामूल्य स्टॉल्सशी पाहणी केली. स्थापना दिनानिमित्त लोकोपयोगी उपक्रम राबविल्याबद्दल आयोजकांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच याप्रसंगी मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाचा त्यांनी कार्यकर्त्यांसमवेत लाभ घेतला.

# कडा येथे राम नवमी उत्सव

आध्यात्मिक: बबन महाराजांचे कीर्तन

पुण्यभूमी प्रतिनिधी



कडा:येथील श्रीराम मंदिरात सुरू असलेल्या रामनवमी उत्सवाची हभप बबन महाराज बहिरवाल यांच्या काल्याच्या कीर्तनाने आज सोमवारी सांगता होणार आहे. दरम्यान रविवारी रामनवमीनिमित्त आयोजित मुकुंदकाका जाटदेवळेकर यांच्या कीर्तन सोहळ्यास भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आष्टी तालुक्यातील कडा येथे दरवर्षी रामनवमीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहासह रामनवमी उत्सवाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी देखील सोमवार दि.३१ मार्चपासून हा सप्ताह सुरू झाला होता. रविवारी हभप जाटदेवळेकर यांचे रामजन्माचे कीर्तन झाले. याप्रसंगी माजी आ. भीमराव धोंडे यांच्यासह कडा परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राम जन्मोत्सवानंतर भाविकांना साबुदाणा खिचडी » पान २ वर

# गुढी पाडवा प्रवेश वाढवा उपक्रम

शैक्षणिक:विद्यार्थी प्रवेशोत्सव, चौथीच्या विद्यार्थ्यांना निरोप



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:शहरातील गुढीपाडवा प्रवेश वाढवा या उपक्रमांतर्गत विद्याभवन प्राथमिक विद्यामंदिर कळंब या शाळेत विद्यार्थी प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मंदार मुळीक, उपाध्यक्ष संजय मुंदडा, मुख्याध्यापक सुभाष लाटे व गावातील पालक,नागरिक, लोकप्रतिनिधी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. सर्व नवागतांचे स्वागत शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी साखरहार व पुष्पगुच्छ देऊन केले. तसेच चौथीच्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देऊन निरोप देण्यात आला.सन २०२५-२६ पासुन नवीन अभ्यासक्रमानुसार सीबीएससीई पॅटर्न या वर्षी शाळेत चालू केला आहे. तरी नवीन विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन शाळेतर्फे करण्यात आले.

# पशुवैद्यकीय दवाखान्यातील डॉक्टर फरार!

बोंबला:अनेक महीने झाले दवाखान्याचे तोंड सुध्दा बघीतले नाही!

पुण्यभूमी प्रतिनिधी




केज:तालुक्यातील चिंचोली माळी येथील पशुवैद्यकीय दवाखान्यातील डॉक्टर चार पाच महिने झाले दवाखान्यात हजरच नाही मग काय डॉक्टर फरार झाले की काय असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.कारण पशुपालक दवाखान्यात जातात तेव्हा डॉक्टर नसतातच मग डॉक्टर काय शासनाचा पगार घेऊन घरी मौजमजा मालतात का असा प्रश्न उपस्थित होतो आहे तसेच पशुपालकांना खाजगी डॉक्टरला मनमानी पैसे देऊन आपल्या पशुचा उपचार घ्यावे लागतात त्यामुळे बेसुमार आर्थिक लुट चिंचोली माळी सह आसपासच्या गावातील पशुपालकांची होऊ लागली आहे त्यामुळे पशुसंवर्धन विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांनी तात्काळ लक्ष केंद्रित केले पाहिजे असे » पान २ वर

# रस्त्यांची साईड पट्टी न भरल्याने कसरत

गैरसोय:कन्हेरवाडी पाटी ते मांडवा रस्त्याचा प्रश्न

पुण्यभूमी प्रतिनिधी



कळंब: तालुक्यातील राज्यमार्ग २०९ कन्हेरवाडी पार्टी ते वाशी तालुक्यातील मांडवा या रस्त्याचे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून सात किलोमीटर डांबरीकरण व सिमेंट रस्ता नुकताच पूर्ण करण्यात आलेला आहे आज तगायतला या रस्त्याचे साईड पट्ट्याचे काम अद्याप केले नसल्यामुळे या रस्त्याने किरकोळ अपघात होत आहेत वाहनचालकांना ओव्हरटेक व साईड देताना साईड पट्ट्या नसल्याकारणाने व साईड पट्ट्याच्या ठिकाणी काटेरी झाडेझुडपे असल्याने वाहन चालकांना वाहन चालवताना कसरत करावी लागत आहे याकडे ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा निष्काळजीपणा सर्वसामान्य माणसाच्या जिवावर उठत आहे तसेच कन्हेरवाडी या गावचे ग्रामदैवत आई सटवाई हे जागृत देवस्थान आहे या देवीच्या दर्शनासाठी व नवस फेडण्यासाठी या रस्त्याने मंगळवार , शुक्रवार आणि रविवारी वाहनाची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते हा रस्ता तयार झाल्यापासून गुत्तेदार यांनी साईड पट्ट्या का भरल्या नाहीत? आणि सार्वजनिक बांधकाम विभाग गप्प का? हा प्रश्न उपस्थित होत आहे या रस्त्याच्या साईड पट्ट्या कधी पूर्ण होतील असे नागरिकांमधून बोलले जात आहे या रस्त्याचे » पान २ वर

जयभिम महोत्सव

## शेकडो विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

# महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेला प्रतिसाद

पुण्यभूमी प्रतिनिधी





बीड:राज्याला आदर्श घालून दिलेल्या बीड जयभिम महोत्सवात महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा पार पडली.या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळाला. स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने सुयोग्य नियोजन केले होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बीडमध्ये ४ एप्रिल ते १४ एप्रिल या कालवधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात रविवार (दि.६) एप्रिल रोजी तुलसी महाविद्यालयात महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा पार पडली. या स्पर्धेतविद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद नोंदवला होता.

महापुरुष सामान्य ज्ञान परीक्षेला अध्यक्ष म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे प्रमुख गौतम चोपडे, प्रमुख पाहुणे म्हणून तुलसी महाविद्यालयाचे प्राचार्य देविदास निकाळजे, सुमेध जोगदंड, डॉ. विनोद किर्दत आदी उपस्थित होते.

### एक हजार विद्यार्थी बसले होते परिक्षेस

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून गुरुवार (दि.३) एप्रिल रोजी महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा तालुका पातळीवर घेण्यात आली होती. त्या परीक्षेला एकूण एक हजार विद्यार्थी बसले होते. त्यामध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा बीड शहरातील तुलसी महाविद्यालय येथे रविवार (दि.६) एप्रिल रोजी पार पडली त्यामध्ये शेकडो विद्यार्थी परीक्षेस बसले होते.

# मल्लांनी कुस्त्यांचे मैदान गाजविले

राम नवमी:दादेगावात नामवंत मल्लांची हजेरी



पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:श्रीरामनवमीनिमित्त दादेगावात विविध धार्मिक कार्यक्रमांसह कुस्तीसारख्या मर्दानी खेळाचे रविवारी आयोजन करण्यात आले होते. या आखाड्यात विविध ठिकाणावरुन आलेल्या नामवंत मल्लांनी हजेरी लावून येथील लाल मातीचे मैदान गाजविले.

आष्टी तालुक्यातील दादेगाव येथे रामभक्तांच्या उपस्थितीत श्रीरामनवमी सोहळा भक्तिमय वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा झाला. या रामजन्मोत्सवानिमित्त ग्रामस्थांकडून आयोजित करण्यात आलेल्या कुस्त्यांच्या आखाड्यात मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रातून आलेल्या नामवंत मल्लांनी आखाड्यात हजेरी लावून येथील लाल मातीचे मैदान गाजविले. परिसरातील भाविकांसह ग्रामस्थांनी कुस्त्यांचा मनमुराद आनंद लुटून मल्लांवर बक्षीसांचा वर्षाव करीत त्यांचे जोरदार स्वागत केले.